# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

## वर्ष पहिले १९७३

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड.

923.60954
NAG
G04274

किंमत तीन रुपये

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04274
DATE: 8/6/2015



नामदार – यशवंतराव चव्हाण

923.60954/NAG
Y.C.P. LIBRARY
G04274

# मनोगत :

" यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला " गेल्या वर्षी सुरू झाली. त्यानिमित्ताने ज्या थोर विचारवंतांची तीन व्याख्याने झाली; त्याची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना मनाला एक समाधान जाणवते.

साहित्य, सौंदर्य, संगीत, क्रीडा करमणूक या समाजजीवनाला समाधान देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगर पालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्ठ्यपूर्ण अभिरूची निर्माण केली आहे त्याचबरोबर आजच्या गतिमान कालखंडात, नव्या पिढीतील समाजघटकांत चिकित्सक नि अभ्यासूवृत्ती वाढीस लागावी. सामाजिक; राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा ही निकडीची गरज आहे. समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यांत येत असते. एका प्रयत्नवादी, अभ्यासू नि यशस्वी अशा सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे जन जागरणाचे; संस्काराचे कार्य आरंभिले आहे !

यशवंतरावजी चव्हाण कऱ्हाडचे सुपुत्र आहेत, अखिल भारतीय नेतृत्त्व त्यांच्या परिश्रमाना लाभलेले फळ आहे. त्यांचा वाढ दिवस हा प्रत्येक कराडकरांच्या जीवनातील एक ममत्वाच्या भावनेंने हेलावणारा दिवस आहे !

यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वरूपात दिसणारे हे नेत्रदीपक प्रज्ञाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्त्व कलेकलेने साकारत गेले; त्याचा विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यांत निश्चित औचित्य आहे ! सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा परिचय होत राहिला; विचार– विवेक– विमर्ष या विचार मंथनाच्या प्रक्रिया व्यक्तीच्या जीवनावर जर संस्कार करून गेल्या तर कोणता सामाजिक अविष्कार दिसू शकतो त्याचे यशवंतरावजी चव्हाण हे मूर्तिमंत उदाहरण आहे !

जन्मतः पारंपरिक सामाजिक किंवा आर्थिक सुबकतेचे वा प्रतिष्ठेचे आवरण यशवंतरावजींना लाभले नाही. प्रतिकूलतेची पाठशिवणी सतत चालू असतांना, आत्मविश्वासाने, अभ्यासूवृत्तीने त्यांनी आपले 'ज्ञान दालन' प्रयत्नपूर्वक समृद्ध केले. ध्येयपूर्तीसाठी ठामपणे उभे राहून, अविचल मनोनिग्रहाने त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची साक्षपटवली आहे. आकांक्षेकडे झेप घेणारी निष्ठा, वाणि करणी त्यांच्या विद्यार्थी दशेतील साधना आहे ! म्हणूनच नव्या पिढीने त्यांच्या व्यासंगाचा नि प्रयत्नवादाचा अभ्यास केला पाहिजे असे वाटत राहाते.

भारतीय सामाजिक नि राजकीय क्षेत्रात ते " एक विचार " म्हणून गौरवले जातात. पण ही त्यांना लाभलेली ईश्वरदत्त गोष्ट नाही. त्यांचा हा होणारा गौरव त्यांनी सतत व्यासंगाने, चिकित्सक वृत्तीने नि अभ्यासाने आत्ममात केलेली " साधना " आहे भावी काळाचा अचूक वेध घेणारी त्यांची प्रज्ञा, त्यांच्या एकाग्र चिंतनाची परिणती आहे. बालवयातही सवंग लोकप्रियतेचा मोह त्यांना झाला नाही. सत्यशोधक सामाजिक चळवळीच्या पेक्षा काँग्रेसच्या व्यापक ध्येय धोरणाचा परिचय करून घेण्यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले होते; भावनेपेक्षा विचाराला शरण जाणे ही त्यांची वृत्ती; त्यांच्या राजकारण पटुत्वाची यशोध्वजा ठरली !

राजकारण असो, समाजकारण असो, अर्थकारण असो कोणत्याही गंभीर समस्येचा विचार एकाग्रतेने करावा. आपल्या सहकारी मित्रा बरोबर साधक बाधक चर्चा करावी आणि भावनावश न होता जो निर्णय तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आहे तो शिरोधार्य मानून कोणत्याही परिणामाची मुलाहिजा न ठेवता त्याचा पाठपुरावा करावा हा यशवंतराव चव्हाणांचा स्वभाव विषेश आहे !

क्वचित् स्वतःच्या मनाला किंवा सहकार्यांच्या मनाला क्लेशकारक निर्णयही; एकदा तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ नि अंतिम श्रेयस्कर आहे अशी खात्री झाली की तो प्रथम उच्चारण्याचे मनोधैर्य यशवंतरावच दाखवू शकतात ! या विज्ञान युगातील गणक यंत्रातून बाहेर पडणारे बिनचूक उत्तरा इतके अचूक निर्णायक उत्तर स्विकारण्याची त्यांची मानसिक तयारी त्यांच्या प्रज्ञेचा चमत्कार वाटतो. राजकारणातील अत्यंत नाजूक नि अत्यंत कठीण प्रसंगी अनेक वेळा याचा पडताळा आला आहे.

परिस्थितीचे अव्हान स्वीकारण्याची त्यांची तयारी स्वतःच्या व्यासंगावरील नि अभ्यासू धारणेवरील जबरदस्त विश्वासच ! मुंबई राज्याचा, महाराष्ट्र राज्याचा नि भारताच्या राजकारणातील त्यांच्या धाडसी भूमिकांची ओळख सर्वांनाच जवळून झालेली आहे. राजकीय वा सामाजिक चळवळीची परिणिती कोठे थांबेल याचे अचुक निदान यशवंतरावजी करू शकतात ; अशावेळी त्यांची शोधकदृष्टी, आपल्या निदानाचे समर्थन करताना बोधक ठरते. पडितांच्या सभेत तर्कशुद्ध नि समर्पक दाखल्यानी बिनतोड युक्तिवाद करणारी त्यांची भाषाशैली ; राजकीय किंवा सामाजिक व्यासपीठावर खास प्रासादिक नि प्रादेशिक लेणें घेऊन, जनसामान्यांच्या मनाचा कब्जा करते !

काँग्रेसचा एक सैनिक म्हणून घेण्यात यशवंतराव स्वतःला धन्य समजत आलेले आहेत. पण ते सैनिक आहेत त्याही पेक्षा ते कुशल संघटक आहेत. सतत कार्यकर्त्यांचा संच उभा करून त्यांना ध्येय निष्ठेने आणि कार्य प्रेरणेने गतिमान करण्यात त्याना लाभणारे यश इतरांनी हेवा करावा असे आहे !

यशवंतराव चव्हाण यांचा जीवनालेख चढता व ढता आहे; पण तो त्यांनी अनुभवलेल्या सामाजिक राजकीय क्रिया--प्रतिक्रियांचा परिपाक आहे.

या व्याख्यानमालेतील व्याख्यानातून यशवंतरावांच्या जीवन–चरित्राची चर्चा होत रहावी हा प्रधान हेतू नाही. तर आज ज्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या ठाकल्या आहेत त्या सामाजिक, राजकिय, आर्थिक समस्यांचा अभ्यास पूर्ण उहापोह अधिकारी व्यक्तिच्या नियोजित व्याख्यानातून व्हावा ; हाच प्रधान हेतू या व्याख्यान मालेचा आहे.

समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे धैर्य नव्या पिढीने, यशवंतरावांच्या सहृदयतेने व अभ्यासू वृत्तीने दाखवावे. यशवंतरावांच्या एकाग्रतेने प्रत्येक समस्येचे मनन चिंतन करावे, यशवंत–रावांच्या तर्कशुद्ध विचार पद्धतीने स्वतःचे निष्कर्ष काढावेत आणि यशवंतरावांच्या ध्येयनिष्ठेने व जिद्दीने ते निष्कर्ष व्यवहारात आणावेत ;! यशवंतरावांच्या भक्तिभावानें समाजाची नि मातृभुमीची सेवा करावी हीच उत्कट भावना या मागे अनुस्युन आहे !!

यशवंतरावांचे जीवन चरित्र हे नव्या पिढीला दीपस्तंभा सारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. म्हणूनच नामदार यशवंतराव चव्हाण यांचे जीवन हा अभ्यासाचा विषय आहे, महाराष्ट्रातील सामाजिक नि राजकीय चळवळीचे प्रवाह समजून देणारा एक जीवन स्रोत खळाळून पुढे धावतो आहे अशा गतिमान व्यक्तिमत्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जनजागरणाचा उपक्रम सुरू करावा; त्यांच्या अभीष्टचिंतना बरोबरच विचार चिंतनाला सुरवात करावी. म्हणून हा सुयोग साधला आहे!

या व्याख्यानमालेत जे जे विचार मंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत "अक्षर" करणाच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हाही हेतू आहे. गेल्या वर्षीच्या व्याख्यानाची ही पहिली पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देताना एकच प्रार्थनाः–

ना. यशवंतरावजीना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

**कराड**
१२ मार्च १९७४

**पी. डी. पाटील**
नगराध्यक्ष



१) व्याख्यान पहिले

प्राचार्य देवदत्त दाभोळकर

फर्ग्युसन कॉलेज, पुणे

# विषय- " राजकारण आणि समाजजीवन

## दिनांक १२ । ३ । १९७३

# ‘ राजकारण आणि समाजजीवन ’

वक्ते– प्राचार्य देवदत्त दाभोळकर,

फर्ग्युसन कॉलेज, पुणे ४.

जशी आरोग्याविषयी आस्था असली पाहिजे, तशीच राजकारणाविषयी आपल्याला आस्था असली पाहिजे. राजकारण हा प्रत्येक व्यक्तीच्या चिंतनाचा आणि चिंतेचा विषय मानला पाहिजे. सामाजिक जबाबदारीचा हा एक भाग आहे. राजकारणात नसणारा मनुष्य, या दृष्टिने पाहता समाजात असू नये.

जीवनाचे तत्वज्ञान हे प्रत्येकाचे काही ना काहीतरी असतेच. एखादा म्हणतो की जीवनाचे तत्वज्ञान नाही, पण ‘ माझं काही तत्वज्ञान नाही ’ हे देखील एक तत्वज्ञानच. या दृष्टीने ‘माझा राजकारणाशी संबंध नाही ’ ही देखील राजकारणाकडे पाहाण्याची एक दृष्टीच आहे.

माझी विचारसरणी या बाबतीत, लोकशाही समाजवादी आहे. यशवंतरावजींचे नेतृत्व प्रभावी आहे, पुरोगामी आहे. पण त्यां नेतृत्वाने मी पूर्णपणे संतुष्ट नाही. जवाहरलाल होते त्या पेक्षा अधिक थोर हवे होते असे मला नेहमी वाटते, तसेच यशवंतरावजींविषयीही वाटते.

राजकारण हेच आपले संपूर्ण जीवन असे मानणाऱ्या काही व्यक्ती असतात. उलट राजकारण उत्साहाने करूनही राजकारण म्हणजेच संपूर्ण जीवन नाही हे जाणणाऱ्या काहीं व्यक्ती असतात. यशवंतरावजी या दुसऱ्या वर्गातले आहेत. जीवन हे राजकारणापेक्षा मोठे आहे. या वृत्तीतून राजकारणाकडे पाहणारे ते आहेत. ही वृत्ती समाजाच्या दृष्टीने हितावह आहे. जे केवळ राजकारण म्हणून राजकारणाकडे पाहून सत्ता येनकेन प्रकारेण मिळविण्यासाठी मूल्यांचा बळी देणारे निःवळ राजकारणी असतात ते समाजाला हितावह ठरत नाहीत. उदाहरणार्थ, नेपोलियन, ‘ सर्व सत्ता माझ्या

हाती रहाण्यासाठीं करावे लागेल ते करीन ' अशी त्याची वृत्ती होती. स्टॅलिन, मुसोलिनी, हिटलर ही आणखी काही अशीच उदाहरणे. याउलट जवाहरलालजींचे व्यक्तिमत्व, गांधीजींचे व्यक्तिमत्व, विनोबाजी, जयप्रकाशजी ही दुसऱ्या प्रकारची उदाहरणे आहेत. टिळकही या प्रकारचेच होते. कुठेतरी त्यांच्या मनात राजकारणाच्या पलीकडे जाण्याची उत्कंठा होती. यशवंतराव याच मालिकेतील आहेत. साहित्य, कला आणि संस्कृती यांविषयी त्यांना आस्था आहे. ' राजकारण आणि समाजजीवन ' या विषयाची निवड करताना समाजजीवनाचे राजकारण हे एक अंग आहे, ही माझी दृष्टी आहे. केन्स हा अेक मोठा अर्थ—शास्त्रज्ञ होता. तो म्हणतो, " मी अशी आशा बाळगतो की एक दिवस अर्थशास्त्राचे महत्व कमी होऊन अर्थशास्त्र आपली योग्य जागा घेईल. साहित्य, संस्कृती आणि कला यांना मानाचे स्थान मिळेल. आज समाजाचे Driving wheel हे अर्थशास्त्र आहे. It Should take the back-seat " केन्स प्रमाणेंच जवाहरलालजी, गांधीजी, विनोबाजी, इत्यादी नेत्यांना वाटते की राजकारण Will take the back–seat ही आशा कितपत युक्त आहे या विषयीचे माझे विचार मी मांडणार आहे.

राजकारण या शद्वाचा वापर करताना आपण निर्भत्सनेचा अंश मनात बाळगतो. ' राजकारण खेळु लागला ' याचा अर्थ करताना ' Everything is fair in war ' या वाक्प्रचाराची छाया मनात असते. ' या संस्थेत राजकारण शिरले आणि खेळखंडोबा झाला ' असे म्हणताना राजकारण हे खेळखंडोबा करणारेच आहे असे आपण मानतो. ही विधाने करताना राज–कारण या शब्दाचा अर्थच आपण मर्यादित करीत असतो. येनकेन प्रकारेण सत्ता मिळवणे आणि टिकविणे व यासाठी बरेवाईट करीत असतांना संस्थेचा विचार न करणे, पक्षाचा विचार न करणे, देशाचा विचार न करणे हा राजकारणाचा मर्यादित अर्थ आहे. या क्षेत्रात वावरणारे लोक अनेकदा असाच विचार करतात. कांही विचारवंत मानतात की मनुष्य मुळात कितीही चांगला असला तरी राजकारणांत सत्ता प्राप्त झाल्यानंतर बदलतो. ' Power corrupts, " absolute power corrupts absolutely " सत्ता मणसाला बिघडवते व अमर्याद सत्ता माणसाला अमर्यादपणे बिघडविते.

पण खरे म्हणजे राजकारण हे एक अत्यंत अवघड असे व्रत आहे. असिधाराव्रत आहे. म्हणून टिळक, जवाहरलालजी, गांधीजी इत्यादींविषयी आदर वाटण्याचे कारण हे की जेथे हे व्रत पाळणे सर्वांत अधिक कठीण होते, तेथे त्यांनी व्रतपालनाची जाणीव आणि वृत्ती कायम ठेवली. हें क्षेत्र उजळणारे हे लोक ठरले. Spiritualisation of Politics असे गांधीजी म्हणत असत. व्यक्तिगत सत्तेच्या पलीकडे जाऊन नैतिक मूल्यांवर सत्ता दृढ करावी. हे शिक्षण नामदार गोखल्यांकडून भारतीय राजकारणाला मिळालेले आहे.

आपली नेत्याकडून त्या त्या वेळी एवढीच अपेक्षा असते की त्याने लढाई जिंकली पाहिजे. मग ती अपेक्षा नेत्याचीही असली तर फारशी चूक का मानावी ? क्रीडाक्षेत्रातही ही अपेक्षा

असते. पाचव्या टेस्टच्यावेळी ड्रॉ होण्याची भूमिका वाडेकर घेतो. म्हणजे क्रीडाक्षेत्रातही मनाची तयारी होत नाहीं; मग राजकारणात तर ते अनंत पटींनी अवघड आहे. भारत स्वतंत्र झाला नाही तरी चालेल, पण नैतिक मूल्यांना धक्का लागता नये असे म्हणणारे एखादेच गांधीजी असतात. हे शंभर टक्के नेहमीच शक्य होणार नाही; परंतु आपली जाण्याची दिशा कोणती आहे ही राजकीय जीवनातली महत्वाची गोष्ट असते. वाडेकर काय करतो ही गोष्ट एका दृष्टीने महत्त्वाची आहे. पण पन्नास हजार प्रेक्षक आणि रेडिओ ऐकणारे पन्नास लाख म्हणत नाहीत की Why don't you declare ? 'नो दुराणी नो टेस्ट' म्हणणारे लोक 'No declaration, no test' म्हणत नाहीत. आपल्या स्वार्थासाठी नेत्यांनी सर्व कांही केले पाहिजे, ही आपली अपेक्षा असते. नेत्याला जनतेच्या पुढेच कांही पावले चालत जावे लागते.

असेच एक विद्यार्थ्यांचे शिबीर भरले होते. 'भारताची सद्यःस्थिती' हा चर्चेचा विषय होता. भारत ज्या दुर्गतीला गेलेला आहे त्याची मीमांसा चालली होती. पक्ष, नेते इत्यादीना दोष देणारी, तारुण्याला साजेशी भाषणे होत होती. एकाने प्रश्न मांडला, की 'भारत दुर्गतीला गेलेला आहे, याला जबाबदार अनेक लोक व पक्ष आहेत. पण भारताच्या दृष्टीने अनुचित असे माझ्या हातून काही घडले आहे काय, याचा आपण प्रत्येकाने विचार करू या.' विचारासाठी पाच मिनिटे वेळ देण्यांत आला. त्यानंतर एकाने म्हटले, 'मी रेल्वेचा प्रवास तिकीट घेतल्याशिवाय केला, ही अनुचित गोष्ट मी केली.' मग इतरांनाही धीर आला. प्रत्येकाने आपलीही अशीच घटना सांगितली. त्या विद्यार्थ्यांनी आपण चुकवलेले पैसे स्टेशनमास्तरना नंतर नेऊन दिले !

तेव्हा आपण ज्या वेळी नेते काय करतात याचा विचार करतो, तेव्हा 'आपण' काय करतो हाही विचार केला पाहिजे. माझ्या अंगात जेवढी शक्ती आहे त्या आधाराने मी काय करतो आहे, हा विचार प्रत्येक व्यक्तीने करणे हा राजकारणाचा समानजीवनाशी संबंधित भाग आहे. आपण आज असे समजतो की पाच वर्षातून एकदा मतदान करून आपण आपली जबाबदारी संपवायची आहे. ही मनोवृत्ती असेल तर लोकशाही समाज उभाच राहू शकत नाहीं.

राजकारण हा शब्द एका अर्थाने चुकीचा. आज तर राजे अस्तित्वात नाहींत, आज 'राज्यकारण' हा शब्द वापरावा लागेल. राजाने कसें वागावे याच्याविषयी फार दीर्घ काळ विचार केला गेलेला आहे सर्वांची उत्तरे जवळ जवळ सारखीच दिसून येतात. सर्वांच्या–मागे एक गोष्ट निश्चित दिसते की जो राजा आहे तो राजा राहिला पाहिजे. हा अधिकार दुसऱ्याच्या हाती न जाण्यासाठी राजाने कोणते तंत्र वापरावे याचा खुलासा प्राचीनांनी वेग–वेगळ्या प्रकारांना केलेला आहे. उदाहरणार्थ, कौटिल्यानें सांगितले आहे की राजाला पैसे गोळा करायचे असतील तर अेखाद्या स्थानाचे माहात्म्य वाढवावे. त्यासाठी देवतेची मूर्ति पुरून ठेवून साक्षात्काराने बाहेर काढावी. कोणी शंका घेतल्यास विषप्रयोग करावा. राजाच्या हाती सत्ता

असणे हीच गोष्ट महत्वाची होती. सगळी मूल्येच इथे बदलतात. 'शाकुंतला' त दुष्यन्ताच्या दरबारात शकुंतला जाते व दुष्यंत तिला झिडकारतो. त्यावेळी तापसी म्हणतो, 'अरे, खोटे बोलणे म्हणजे काय हे जिला माहीत नाही अशा मुलीवर, दुसऱ्याला कसे फसवावे हे शास्त्र विद्या म्हणून शिकलेला तू, आरोप करतोस ? " राजाचे कामच ' परातिसन्धानमधीयते यैः ' ही विद्या शिकण्याचे होते. आपल्या मनांत काय आहे ते दुसऱ्याला कळू न देणे, सत्यापासून दूर जाणे हे मुत्सद्देगिरीचे पहिले लक्षण मानले जाते. डिप्लोमॅट कोण ? तर ' When he says yes ', he means ' perbaps ' if he says ' perhaps ', he means ' no ' if he says ' no ' he is not a diplomat. अशा पद्धतीचे राजकारण राजाच्या बाबत घडत आले त्यावेळी समाज ' राजा म्हणेल ती पूर्व दिशा ', ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' अशी श्रद्धा बाळगून होता. 'राजाचा ईश्वरदत्त अधिकार, ही विचारसरणी समाजाच्या मनात दृढमूल झालेली होती ' My king right or wrong ' हे स्वामिभक्तीचे लक्षण होते. पती अनाचारी असला तरी त्याच्याशी एकनिष्ठ असणे हा पतिव्रतेचा आदर्श तसेच राजाने मारले आणि पावसाने झोडपले तर मुकाट्याने भोगायचे हा समाजाचा आदर्श होता. या मानसिक आदर्शापासून पुढे जाऊन कोण–तीही एक व्यक्ती शास्ता नाही, राज्य करणारी जनता ही शासकसत्ता आहे. हा टप्पा म्हणजे फार मोठा टप्पा आहे. वैचारिकदृष्ट्या आपण या टप्प्यावर आलेले आहोत.

ज्या समाजाच्या आधारावर लोकशाही उभी करावयाची, तो एकसंघ असावा लागतो· कोणताही समाज जितका एकात्म नसेल तितक्या प्रमाणात त्या देशातील लोकशाही दुबळीच राहणार. एकसंधता, एकात्मता म्हणजे ' माझ्यासारखेच दुसऱ्याचे विचार असले पाहिजेत ' असे नाही. एकात्मता हवी असेल तर त्यात वेगवेगळे विचार, कल्पना, प्रतिक्रिया असू शकतील, पण त्या सगळ्यांच्या आत ' हम सब एक हैं ' ही भावना मुरलेली असेल ही लोकशाहीची मुख्य अट आहे. हे अेक संपूर्ण समाजजीवनाचे चित्र आहे. एकात्म समाजाचे चित्र ! ज्या ज्या कारणाने हे शक्य होत नाही त्या सर्व गोष्टींचा विचार आपण नीट केला पाहिजे.

बँकेत कर्ज देताना व्यक्तीचे तारण विचारण्यापेक्षा गावाचे तारण का स्वीकारले जात नाही ! त्यामुळे बँकांचे काम सोपे होईल. एकेक गांव उभा राहू शकेल. पण ही अत्यंत दुर्घट गोष्ट आहे ज्या गावाकडे अशा तारणावर एक लाख रुपये दिले जातील, त्यांचे वाटप आजच्या परिस्थितीत ' हा पुढारी, हा श्रीमंत, हा माझ्या जातीचा ' अशा पद्धतीने होईल. तर त्याचाच अर्थ ते गांव एकात्म नाही. लोक एकत्र राहतात, पण एकात्म नाहीत. जोवर हे असे आहे, समाजात असे गट पडलेले आहेत, तोपर्यंत राजकारण हे एका गटाचे दुसऱ्या गटावर आक्रमण ठरणार. हें आक्रमण प्रगट असेल किंवा प्रच्छन्न, पण आक्रमण होत राहणारच. मार्क्स म्हणतो, ' State is an instrument in the hands of the ruling class for

dominating over other classes ' वरिष्ठ वर्ग शासन संस्था ताब्यात ठेवून त्याचा वापर करतो. मार्क्सच्या दृष्टीने हा वरिष्ठ वर्ग मुख्यत: आर्थिक असतो. पण वर्ग कोणत्याही कारणाने संघटित झालेले असतील. या संघटित वर्गापैकी एक वर्ग सत्ता वापरीत असतो. मग जनतेचे हित कसे होणार ?

अशी समाजरचना हवी की जेथे शासनसंस्थाच अस्तित्वात असणार नाही. मग राजकारण बाहेर जावून समाजरचनाच अस्तित्वात राहील. मार्क्सचे म्हणणे असे की ही गोष्ट केवळ शक्यच नव्हे, तर अटळ आहे. ज्यावेळी समाजात वर्गच असणार नाहीत त्यावेळी एका वर्गाने राज्य करण्याचा प्रश्नच येणार नाही. The state shall whither away.

आदर्शामध्ये शासनसंस्था नसेल आणि शासनविहीन सुसंघटित समाज अस्तित्वात असेल. हा आदर्श केवळ मार्क्सचा नाही. गांधीजींचा आदर्शही राजनीती नसावी, लोकनीती असावी असाच होता.

राज्यसंस्था नसावी, म्हणजे अराज्यवाद, म्हणजे अनार्किझम म्हणजे अराजक, म्हणजे हावळागोंधळ ? यालाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. समाजरचना बदलण्यासाठी अवधाने ठेवावी लागतात काही लोकांनी याकरिता अत्याचाराचा मार्ग स्वीकारला. शासनसंस्था नाहीशी केली पाहिजे, म्हणजे शासनकर्त्यांना ठार केले पाहिजे असे त्यांनी मानले. या पण पद्धतीने केवळ एक शासनकर्ता जाऊन त्याच्या जागी दुसरा येतो. शासन संस्थेचा निरास करणे ही गोष्ट वेगळीच आहे. शासनकर्ते म्हणजे शासनसंस्था नव्हे. गांधी, विनोबा, जयप्रकाश यांच्यासारखे लोकही अराज्यवादाचा पुरस्कार करतात ही कल्पना देखील फार पूर्वीच्या काळापासून आहे. महाभारतात या आदर्शाचे वर्णन आहे.

" नैवराज्यं न राजासीत् न दण्डयो न च दण्डिक: ।
धर्मेणैव प्रजा: सर्वा: रक्षन्ति स्म परस्परम् ।। "

अर्थात धर्म म्हणजे नीतिनियम, सामाजिक वागणुकीचे नियम. तर असे शासनविहीन राज्य हे कल्पनेच्या आदर्शात शक्य आहे.

ज्या प्रमाणात समाजाची पातळी वरवर चढत जाते, त्या प्रमाणात बाह्य बंधनांची आवश्यकता कमी होत जाते. ही पातळी समाजातील सर्व घटकांनी आपली जबाबदारी ओळखून वर न्यायची असते. सर्व माणसे देवमाणसे झाली तरच हे घडू शकेल असे मानण्याचे कारण नाही. तोच माणूस वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या पद्धतीने वागत असतो. उदाहरणार्थ, एखादा बसस्टॉप घ्या. तिथे क्यू लावलेला नाही. अशा वेळी मी जर विचार केला की मीच एकटा रांगेने जाईन, सर्व लोक बसने निघून जातील आणि मी जागच्या जागीच राहीन. माझ्या अंगावर मुंग्याचे वारूळ तयार होईल तरी मला बस मिळणार नाही. म्हणून मलाही पुढे घुसूनच बस पकडावी लागते. इथे माझा दोष नाही तर रचनेचा दोष आहे. आज आपण शासनयंत्रणेकडून सगळ्या अपेक्षा ठेवतो; परंतु या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कांही रचनेची जबाबदारी आपलीही आहे. लोकशाहीचे खरे सामर्थ्य जितके वाढत जाईल तितके आपोआपच शासनाचे सामर्थ्य व व्याप कमी होत जातो. जनतेच्या सर्वसाधारण वृत्तीचे प्रतिबिंब शासनात उतरणे हे महत्त्वाचे आहे.

शेवटी ध्येये ही ताऱ्याप्रमाणें असतात आपण ताऱ्यांपाशी पोचू शकत नाही. पण ताऱ्यांचा मागोवा घेतच खलाशी जात असतात राजकारण आणि समाजजीवन यांच्या एकात्मतेच्या ध्येय ताऱ्याच्या प्रकाशात आपल्या जीवनप्रवासाचा मार्ग आपल्याला आखता येईल.

---



२) व्याख्यान दुसरे

## आमदार मा. प. मंगुडकर, पुणे

# विषय- “ भारतीय समाजवाद कांही विचार ”

## दिनांक : १३ - ३ - १९७३



# ' भारतीय समाजवाद; काही विचार '

प्रा.– मा. प. मंगुडकर.

अध्यक्ष महाशय आणि मित्रहो, नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने आज ही व्याख्यानमाला सुरू होत आहे हे मी जेव्हा प्रथम ऐकले तेव्हा मला मनापासून आनंद झाला. त्याची दोन-तीन कारणे मी सांगू इच्छितो. माझी अशी प्रामाणिक ( इच्छा ) श्रद्धा आहे की नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनामधील ज्या प्रेरणा आहेत, ज्या प्रेरणांच्यामुळे त्यांचे सर्व जीवन घडविलेले आहे. त्या प्रेरणा मूलभूत अशा तीन प्रकारच्या आहेत. त्यांच्या जीवनातील एक मध्यवर्ती महत्त्वाची प्रेरणा म्हणजे समाजामध्ये जो दुबळा घटक आहे, या घटकाबद्दलची अथांग सहानुभूती अंतःकरणामध्ये असणे ही आहे. दुसरी प्रेरणा म्हणजे ज्ञानाबद्दल त्यांना विलक्षण आकर्षण आहे. आणि तिसरी प्रेरणा म्हणजे आपल्या कल्पनाप्रमाणे व श्रद्धांप्रमाणे केवळ समाजामधल्या घटनांचा अन्वयार्थ लावणे येवढाच त्यांचा प्रयत्न नसून, समाज–जीवन आपल्या कल्पनाप्रमाणे व निष्ठाप्रमाणे बदलण्याची तीव्रतर इच्छा त्यांच्यापाशी आहे. या तीन प्रेरणांच्यामुळे त्यांचे जीवन मुख्यत: घडविलेले आहे. बर्ट्रांड रसेल हा २० व्या शतकातला फार मोठा विचारवंत आहे. मी तर त्यांना २० व्या शतकातला सॉक्रेटिसच मानतो. चांगल्या जीवनाची कल्पना मांडताना त्यांनी म्हटले आहे. " Good life is one, which is inspired by love and guided by knowledge " ज्या जीवनामध्ये दीनदुबळ्याबद्दल अथांग प्रेम आहे, आणि जीवनाचे मार्गदर्शक ज्ञान ही आहे, ते जीवन चांगलं आहे, बर्ट्रांड रसेल यांच्या चांगल्या जीवनासंबंधीच्या कल्पनेचा एक चांगला, उत्तम आविष्कार म्हणजे नामदार यशवंतरावजींचे जीवन आहे. तिसरी

गोष्ट मुख्यत: बर्ट्रांड रसेल व कार्ल मार्क्स या विचारवंतांबद्दलची आहे. त्यांनी असे सांगितले आहे की. ' Philosophers have interpreted the world problem. to change it.' आतापर्यंत जगामध्ये जे मोठमोठे विचारवंत झाले ते केवळ जगाचा अन्वयार्थ लावण्यामध्येच मशगुल झालेले होते. मुख्य प्रश्न हा केवळ जगाचा अन्वयार्थ लावण्याचाच नाही तर आपल्या तत्त्वाने आपल्या कल्पनांप्रमाणे जग बदलू पहाणे हा महत्त्वाचा भाग आहे. या तीन मूलभूत प्रेरणांचा एक चांगला आविष्कार म्हणजे यशवंतरावजी चव्हाण यांचे जीवन होय. या प्रेरणा घेऊन आपली ही व्याख्यानमाला सुरू केली आहे. नकळत आपण या व्याख्यानमालेद्वारे या तीन मूल्यांची जोपासना करीत आहोत. आणखी एक गोष्ट सांगून मी नंतर माझ्या विषयाकडे वळतो. यशवंतरावजींच्या जीवनामध्ये मला आणखी एक गोष्ट दिसते ती ही आहे की समाजामध्ये, राष्ट्राच्या जीवनामध्ये सतत वेळोवेळी नव्या नव्या सामाजिक आणि आर्थिक शक्तींचा उदय होत असतो किमान समाजजीवनामध्ये हे अटळ असतं. त्या शक्तीचे स्वरूप समजावून घेणे व त्याप्रमाणे ध्येय धोरणात बदल करणे हे आवश्यक असतं. गतिमान नेतृत्वाचं एक व्यवच्छेदक लक्षण कोणतं असेल तर समाजामध्ये वेळोवेळी नव्याने उदयास येणाऱ्या सामाजिक व आर्थिक शक्तींचा अन्वयार्थ लावणे, त्या शक्तींचं स्वरूप समजावून घेणे आणि त्या कल्पनांच्या मध्ये ध्येय धोरणामध्ये बदल घडवून आणणं हे गतिमान नेतृत्वाचे वैशिष्टय असते. यशवंतरावांच्या जीवनाचा जर आपण अभ्यास केला तर मला असं वाटत त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील वेगळेपण हे दिसत आहे की स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या शक्ती होत्या त्यांचे स्वरूप त्यांनी समजावून घेतले आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जे जे काही शक्य होते ते दिले. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर सर्व प्रश्नांचे स्वरूप बदलून गेले आणि एक विकासाच्या काळाचं नवं, आव्हान पुढं येत असतं आणि ते ते प्रत्येक आव्हान समर्थपणे स्वीकारत ते पुढे चाललेले आहेत. त्यामुळेच त्यांचे जीवन हे एका दृष्टीने गतिमान नेतृत्व आहे. अशा एका नेतृत्वापासून प्रेरणा घेउन आपण ही व्याख्यानमाला सुरू करता आहात त्याबद्दल मी आपणास अत्यंत अंत:करण पूर्वक धन्यवाद देतो. या व्याख्यान मालेच्याद्वारे आपल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये या मूलभूत प्रेरणांची उपासना होईल अशा तऱ्हेची उमेद बाळगून मी माझ्या मुख्य विषयाकडे वळतो.

माझा आजचा विषय आहे तो ' भारतीय समाजवाद काही विचार ' असा आहे. हा विषय मी मुद्दाम घेतलेला आहे. कारण दिवसातून जे शब्द वारंवार उच्चारले जातात त्यापैकी समाजवाद हा एक शब्द आहे. त्यामुळे या विषयाची या तत्त्वज्ञानाची एकदा शास्त्रीय पद्धतीने मीमांसा झाली पाहिजे म्हणून मी हा विषय घेतलेला आहे. त्याबरोबर दुसरी गोष्ट अशी की माझी श्रद्धा आहे की तीन मूलतत्त्वे ही आपणाला पुढील दशकामध्ये बळकट करावयाची आहेत. ही तत्त्वे म्हणजे-एक धर्मनिरपेक्ष राज्याचं तत्त्व ज्याला मी सिक्युलॅरिझम असे म्हणतो. दुसरे तत्त्व लोकशाही ( Democracy ) आणि तिसरे तत्त्व म्हणजे समाजवाद ( Socialism ) त्यामुळे पुढील दशकामध्ये धर्मनिरपेक्ष राज्याचं तत्त्व लोकशाही आणि समाजवाद या तीन मूल्यांची

उपासना करून ही तीन मूल्ये आपल्या जीवनामध्ये बळकट करावयाची आहेत. याही दृष्टीने समाजावादी तत्त्वज्ञानाला एक अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. आणि या दृष्टीने या संबंध तत्त्वज्ञानाचं गतिमान स्वरूप काय आहे, बदलतं स्वरूप काय आहे हे आपणाला समजावून घेण जरूरीचं आहे. माझ्या व्याख्यानाचं स्वरूप कसं असेल हे मला अगोदरच सांगितले पाहिजे. सगळया जगभर गेल्या १०-१५ वर्षामध्ये जी काही अत्यंत महत्वाची स्थित्यंतरे घडत आहेत त्यांची स्वरूपं समजावून घेणारी विकसनशील राष्ट्रे आहेत, त्याच्या मध्ये काय स्थित्यंतरे घडताहेत आणि हिंदुस्थानसारख्या आशिया मधील राष्ट्रांमध्ये आपणाला नवी आव्हानं काय आहेत त्यांच्या स्वरूपासंबंधी ढोबळ मानानं माझ्या विवेचनांच स्वरूप राहील. पहिली गोष्ट ही आहे की या मूलभूत कल्पना अत्यंत महत्वाच्या आहेत की ज्यामुळे जगाचा गेल्या १०० / १५० वर्षांचा इतिहास घडविला गेला आहे. या कल्पना म्हणजे समाजवाद, राष्ट्रवाद, साम्यवाद, व लोकशाही या होत. These are the ideas which influece the world. या कल्पना अशा आहेत की त्यांनी सगळया जगाच्या इतिहासावर प्रभाव पाडलेला आहे. म्हणजे सबंध जगाची चेहरेपट्टी बदलून टाकली आहे. या तत्वज्ञानांनी या तत्वप्रणालीनी, या विचारांनी. समाजवाद हा एक त्यापैकीच विचार आहे. या सगळयाच कल्पनामध्यें १०/१५ वर्षामध्ये फार मोठा फरक पडलेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर बदल घडतो आहे. आणि गेल्या काही वर्षामध्ये फार मोठा बदल घडतो आहे. हा बदल अशा स्वरूपाचा आहे की, या सगळयाच कल्पना समाजवाद, साम्यवाद (कम्युनिझम) राष्ट्रवाद, भांडवलशाही, लोकशाही आता एखाद्या वितळणाऱ्या भांड्यात (Melting pot) ठेवाव्यात अशा स्वरूपाच्या झालेल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धा अगोदर त्यांच जे साचेबंद स्वरुप होतं ते आता बदलत चाललं आहे. आणि त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचे अगोदर या विचारांचा जो साचेबंदपणा होता तो आता नव्या स्वरुपात कालबाह्य होत चाललेला आहे. निरूपयोगी ठरत आहे. झपाट्याने बदल होत चाललेला आहे. समाजवाद हा त्यापैकीच एक विचार आहे. त्यामध्ये फार झपाट्याने बदल होत आहे. मी फक्त दोन बदल तुम्हाला सांगतो व ते कसे होत गेले आहेत हेही सांगतो. युरोपमध्ये मुख्यत: औद्योगिक क्रांती आणि तंत्रविषयक क्रांती ( Industrial Revolution and Technological Revolution ) यांच्यामुळे युरोप अमेरिकेमध्ये फार झपाट्याने बदल होत आहेत याचे कारण त्यांच्याकडील मोठमोठे विचार वंत हे होत, त्यानी गेल्या दहा वर्षांत Socialism च्या संदर्भात काही विचार मांडले आहेत. हे विचार जागतिक पातळीवर मांडले आहेत. त्या संदर्भात आपण विचार केला पाहिजे.

त्यांचं म्हणण असं आहे की गेल्या कांही वर्षात समाजवाद आणि भांडवलशाही यांच्यातलं अंतर झपाट्याने कमी होत आहे. इतकेच नव्हे तर या दोन्हीचा एकमेकावर प्रभाव पडत चाललेला आहे. आणि दोन्हींच्या सीमारेषा एकमेकांमध्ये मिसळून चाललेल्या आहेत. एकमेकात Converse होत चाललेल्या आहेत. गॅलब्रेथ नावाचा एक अमेरिकन विचारवंत आहे. त्याने Theory of conversions हा विचार प्रथम मांडला. जगातल्या अनेक विचारवंतांनी अर्थशास्त्रज्ञांनी त्या कल्पनांचा Theory of Conversion चा पाठपुरावा केला. आणि आज

पुष्कळसे विचारवंत या निष्कर्षाप्रत येऊन पोचेले आहेत की दुसऱ्या महायुद्धाअगोदरच भांडवलशाहीचे स्वरुप, कम्युनिझमचं स्वरुप हे दोन्हीही आता इतिहास जमा होत चाललेले आहेत. एकमेकांचा दोन्हींवर प्रभाव पडत चाललेला आहे. उदा०- रशियामध्ये जो कम्युनिझम आहे त्याच्यामध्ये गेल्या सात-आठ वर्षांत अर्थव्यवस्थेत बदल होत चालला आहे, आणि आज रशियातील अर्थव्यवस्थेत Private property, Profit Motive यांचा हळूहळू समावेश होत चालला आहे. त्यांच्याकडे 'लिबरलमन' म्हणून एक अर्थशास्त्रज्ञ होता त्याने. १९६४ साली एक वेगळा सिद्धांत मांडला. आणि त्यानंतर Profit motive, नफ्याची प्रेरणा जी आहे ती शेतकऱ्याच्या जीवनामध्ये तुम्हाला दिली पाहिजे असे सांगून Private Kitchen ची कल्पना हळूहळू सर्वमान्य होऊ लागली जाहे. इतकंच नव्हे तर आता रशियामध्ये ४०%, भाजीपाला, ४०% फळफळावळ एकूण खाजगी बागेमध्ये होत आहे कीं ज्याचा नफा मर्यादित का होईना, पण मालकांना मिळतो. खाजगी मालमत्तेची कल्पना तिथं हळूहळू उदयास येत चाललेली आहे. Profit Motive हे तत्त्वही आता मान्य करण्यात आले आहे, त्याचबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये Consumer's Sovereignty असं आम्ही अर्थशास्त्रामध्ये म्हणतो. म्हणजेच 'ग्राहकांचे सार्वभौमत्व ही कल्पना कम्युनिझमला केव्हाही मान्य नव्हती. किंबहुना भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे ते एक व्यवछेदक लक्षण होय. आता तुम्हाला अस दिसून येईल की गेल्या सात-आठ वर्षामध्ये Consumer's Sovereignty ची जो कल्पना आहे. ग्राहकांचे सार्वभौमत्व जे आहे ही कल्पना रशियामध्ये हळूहळू सर्वमान्य व्हायला लागली आहे. त्याचं कारण असं आहे की ते Cousumers विचारात न घेता मालाचे उत्पादन करीत असायचे. परिणाम असा व्हायचा की पादत्राणं करोडो प्रमाणावर उत्पादन करायची आणि त्याचा परिणाम असा व्हायचा की लोकाना ती आवडत नसायची. आणि मग एका बाजूला मालाचे ढीगचेढीग पडलेले दिसायचे आणि दुसऱ्या बाजूला लोकांच्या गरजा थांबायच्या. लोक खरेदी करत नाहीत असं जेव्हा त्याना दिसायला लागलं तेव्हां लोकांचे सार्वभौमत्व जे आहे ते देखील आपण विचारात घेतलं पाहिजे आणि त्यानुसार उत्पादनात बदल केला पाहिजे हे उत्पादकांच्या लक्षात आलं. या उलट अमेरिकेसारख्या देशामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या बालेकिल्यात-महत्त्वाचे बदल होत चाललेले आहेत. आज अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या २४% राष्ट्रीय संपत्ती सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. गॅलब्रेथ एकदा थट्टेने म्हणाला होता की, राष्ट्रीय संपत्ती ही सरकारच्या नियंत्रणाखाली किती असावी याचा निकष लावला तर तुमच्या देशामध्ये २२% ते २३% संपत्ती राष्ट्राच्या मालकीची आहे. आणि माझ्या राष्ट्रामध्ये २४% ते २५ % संपत्ती राष्ट्राच्या मालकीची आहे. आणि हा जर निकष लावला तर माझा देश तुमच्या देशापेक्षां अधिक समाजवादी आहे. सांगण्याचा इत्यर्थ इतकाच की गेल्या १०-१५ वर्षामध्ये २४%, २५% राष्ट्रीय संपत्ती राष्ट्राच्या मालकीची आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदरच्या काळाध्ये २ ते ४ टक्के एवढी देखील संपत्ती राष्ट्राच्या मालकीची नव्हती. अमेरिकन अर्थव्यवस्थेत-भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये Demand and Supply या संबंधी विचार केला जातो

आधी Demand मग Supply पण तिथं आता उलट होत चाललेलं आहे. आधी Supply आणि मग Demand निर्माण करतात. प्रचंड प्रमाणात आधी Supply करायचा आणि मग Demand निर्माण करायची जाहिरातींच्या रूपाने वेगवेगळया मार्गांनीं अन्य नेहमीचे अर्थशास्त्रीय सिद्धांत आता शीर्षासन करत आहेत उलटे पालटे होत आहेत. हा बदल मी तुम्हास अशासाठी सांगतो आहे की परंपरागत अर्थशास्त्रामधल्या, राज्यशास्त्रामधल्या, समाज-शास्त्रामधल्या ज्या कल्पना आहेत त्यांच्यामध्यें आता मूलभुत बदल होत चाललेले आहेत. या सर्व कल्पना एखाद्या वितळणाऱ्या भांड्यात ठेवाव्यात असे त्यांचे स्वरुप झालेले आहे. हा जगभर होत असलेला बदल लक्षात घेऊनच कोणत्याही विचारांचा आपणाला यापुढे अभ्यास करावा लागणार आहे. तो Theory of Conversions भांडवलशाही आणि समाजवाद हे तंत्रविषयक क्रांतीमुळे जवळ येत चाललेले आहेत. दोघांचा एकमेकावर प्रभाव पडत चाललेला आहे. आणि पुढच्या पंचवीस वर्षाच्या काळात दोघामधील अंतर पुष्कळच कमी होणार आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी या दोन्ही तत्त्वज्ञानामधील सीमारेषा इतक्या पुसट होणार आहेत की एकेकाळी यांच्यामध्ये शत्रुत्व होते. दोन टोकं होती हे एखाद्याला सांगूनही खरं वाटणार नाही. अशा तऱ्हेचे विचार युरोपमधील नामवंत विचारवंत आज सांगू लागले आहेत या प्रश्नाकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो ही पहिली गोष्ट. आणि दुसरा समाजवादाच्यादृष्टीने जगभर जो बदल होतो आहे, त्याबद्दल मी सांगतो आहे, आणि मग भारताकडे येऊ. भारताच्या संद-र्भात या विचारांची नंतर आपण समीक्षा करू दुसरा बदल जो होतो आहे तो मी तुम्हाला मुद्दाम सांगतो आहे तिकडे आपण गंभीरपणानं लक्ष दिलं पाहिजे. इंग्लंडमध्ये जो बदल होतो आहे तो असा की गेल्या १०, १२, वर्षांत समाजवाद म्हणजे राष्ट्रीयीकरण ही कल्पना व्यवछेदक लक्षण मानली जाते. समाजवादाचे वेगळेपण जर काय असेल तर उत्पादनाची साधने राष्ट्राच्या मालकीची असतात. आज इंग्लंडमध्ये गेल्या कांही वर्षामध्ये राष्ट्रीयीकरणासंबंधी असलेला उत्साहाचा लोंढा आज ओसरत चाललेला आहे. किंबहुना संबंध जगभर, पश्चिम जगामध्ये हा झपाट्याने ओसरत चाललेला आहे. त्यांच्याकडील लेख वाचले, त्याच्याकडील ग्रंथ वाचले, त्यांच्याकडील विचारवंताशी चर्चा केली तर तुम्हास असे आढळून येईल की १९४५ साली दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रीयीकरणासंबंधीचा त्यांच्याजवळ जो उत्साह होता तो आता १९७३ साली राहिलेला नाही. इंग्लंडमधील मजूर पक्षाचे निवडणुकांचे जाहीरनामे जर तुम्ही घेतलेत तर १९४५ साली राष्ट्रीयीकरणाच्या कल्पनांनी ते भारावलेले होते. जगातल्या सगळ्या प्रश्नांवर एकच तोडगा आहे. आणि तो म्हणजे राष्ट्रीयीकरण, अशा श्रद्धेने त्यांनी आपला जाहीरनामा तयार केलेला होता. आता गेल्या दोन निवडणुकाचा जाहीरनामा तुम्ही तर वाचला तर त्यांत राष्ट्रीयीकरणाचा कोठे उल्लेखही नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीयीकरणाचा चुकूनही उल्लेख नाही. हा जो बदल मजूरपक्षाच्या धोर-णात झालेला आहे हा सुद्धा त्यांच्या तत्त्वप्रणालीचा प्रवाह आहे. त्यामध्येही दोन प्रवाह आहेत.

Future of Socialism या नावाची त्यांची काही पुस्तके आहेत त्यांमधून मजूर पक्षामध्ये जे काही चिंतन चालू आहे ज्या काही प्रतिक्रिया चालू आहेत ते तुम्हाला पहायला मिळेल. राष्ट्रीयीकरणासंबंधीचा जो उत्साह ओसरत चालला आहे, त्याचं कारण ते असं म्हणताहेत की ज्या ज्या धंद्याचं राष्ट्रीयीकरण केलं त्या त्या धंद्याचं उत्पादन खाली खाली गेलं, गुणवत्ता खाली खाली गेली व Administration वरील खर्च वाढत गेला आणि नफा त्यामध्येच जिरून गेला. राष्ट्रीयीकरणाच्यामागील कल्पना काय असते की करोडो रुपये जे भांडवलदारांच्या खिशात जातात ते राष्ट्राच्या मालकीचे करायचे. त्याच करोडो रुपयांतून गरीब माणसाच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना घ्यायच्या, कोठे गलिच्छ वस्ती निर्मूलनाचे कार्य हाती घेतील. कोठे मुलांना दूध देण्याचे कार्य हाती घेतील. गरीब माणसाच्या विकासाच्या दृष्टीने ज्या ज्या योजना असतील त्या त्या हाती घ्यायच्या हा राष्ट्रीयीकरणामागील मुख्य हेतू होय. परंतु प्रत्यक्षात अनुभव मात्र असा यायला लागला की, उत्पादन खाली खाली येत चालले, गुणवत्ता खाली येत चालली, खर्च वाढत गेला, व त्यामुळे नफा जिरून गेला आणि काही काही वेळेला होणारे तोटे भरून काढण्यासाठी गरीब माणसावर कर लादून ते धंदे तोट्यात चालवावयाचे. असा अनुभव इंग्लंडमध्ये यायला लागल्याबरोबर ते असं म्हणू लागले की आम्हाला राष्ट्रायीकरणाबद्दल पूर्वी जे वाटत होते ते आता वाटत नाही आता त्यांचे असे सिद्धांत येत चाललेले आहेत की मालकी हक्क बदलणे म्हणजे मूलभूत क्रांती नव्हे " Change of ownership is not a basic Revolution. " त्यांचेकडे मोठमोठे विचारवंत आहेत ' Future of Socialism ' या नावाचं पुस्तक लिहिणारा एक विचारवंत आहे. त्याच्यामध्ये त्यानी असं म्हटलं आहे की मालकी हक्क बदलणे ही फार मोठी क्रांती नव्हे. गरीब माणसाच्या जीवनात सुख निर्माण करणे ही मूलभूत क्रांती होय. त्यांचे दारिद्र्य हटविणे. गरीब माणसाच्या जीवनात काही आकांक्षा निर्माण करणे हा मुलभूत बदल आहे. तुम्ही केवळ मालकी हक्क बदलण्याच्या कल्पनेमध्ये समाधान मानत असाल व त्यामध्येच मशगुल राहिला असाल तर तुम्ही मुलभूत उद्दिष्टापासून दूर राहिलेले आहात असा त्याचा अर्थ होईल. अशा तऱ्हेचे चिंतन आज मजूर पक्षात चालू आहे. फ्रान्समध्ये चालू आहे. स्कॅन्डेनेव्हीयन कंट्रीजमध्ये आहे नार्वे, स्वीडन, डेन्मार्क येथे चालु आहे. हे मी तुम्हाला अशासाठी सांगतो आहे की जगातील इतर भागांत समाज-वादासंबंधी काय चिंतन चालू आहे, काय विचारप्रवाह चालू आहेत याचा अपणाला तोंड परिचय व्हावा. मी फार खोलात जाऊन या प्रश्नाची चर्चा करु शकत नाही. पण फक्त मी अंगुली निर्देश करतो आहे की बदल काय काय होताहेत आणि त्या दृष्टीने माझा सांगण्याचा हेतू एवढाच की परंपरागत कल्पनामध्ये गेल्या १०।१५ वर्षांत दुसऱ्या महायुद्धानंतर आणि विशेषतः आशियाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे बदल होताहेत. ज्या परंपरागत कल्पना आहेत त्या आपणाला जशाच्या तशा स्वीकारता येणार नाहीत. त्या पुन्हा पुन्हा तपासल्या पाहिजेत.

युरोपातला समाजवाद, आणि आशियातला समाजवाद यामध्ये २–३ महत्त्वाचे फरक वाटतात युरोपातील समाजवाद हा तिकडे औद्योगिक क्रांतीनंतर आला. औद्योगिक क्रांती नंतर त्यांची राष्ट्रसंपत्ती अनेक पटीने वाढल्यानंतर त्यांच्याकडे समाजवाद आला. तेव्हा त्या समाजवादा समोरचा जो मुख्य प्रश्न होता, जे आव्हान होते ते हे की, या वाढलेल्या संपत्तीचं विभाजन करणे, न्याय्य वाटप करणे Equitable distribution करणं हा होता. आणि त्यांचां राष्ट्रीय संपत्ती पूर्वी पेक्षा ३०, ४०, ५० पट वाढलेली होती. ज्या राष्ट्रांची संपत्ती औद्योगिक क्रांतीपूर्वी १ कोटी होतीं, १०० कोटी होती, ती औद्योगिक क्रांतीनंतर ३ हजार ४ हजार कोटी अशी वाढली आहे. अर्थात ही संपत्ती मूठभर लोकांच्या हातातच केंद्रित झाली होती ही गोष्ट खरी आहे. तरी देखील राष्ट्राची संपत्ती अनेक पटीने वाढली होती त्यामुळे Distribution चा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. आणि Distribution चेच मुख्य आव्हान त्यांच्यापुढे होते. आणि यामधल्या आणि भारतामधल्या समाजवादापुढं असणारं आव्हान हे Distribution चं नाही. आपली आव्हान दुहेरी आहेत, Production and Distribution अशी ती आव्हान आहेत. आपणाला राष्ट्रीय संपत्ती वाढवावयाची आहे आणि ती वाढवत असतानाच तिचं योग्य विभाजन करावयाचे आहे. कारण आपल्या देशामधील प्रत्येक माणसाचं राष्ट्रीय संपत्तिमान हे १४ आणे किंवा एक रुपयासुद्धा नाही. आपल्या देशातील २०% लोकांचे हे उत्पन्न ४ आणे ते ५ आणे येवढं कमी आहे. पण सरासरी आपल जे उत्पन्न आहे ते वर्षाला ३५० कोटी रुपयांचे आहे. त्या मध्येही काही मतभेद आहेत. परंतु सरासरी जे आपलं राष्ट्रीय उत्पन्न आहे ते माणसी १२ ते १४ आणे आहे. आजच्या काळामध्ये हे १२ ते १४ आणे उत्पन्न काय आहे याची कल्पना आपण करु शकतो. त्यामुळे आपल्या देशामध्ये Distribution चा प्रश्न आपण आदर्श पद्धतीने सोडविला व जगातल आदर्श जरी आपण निर्माण केला तरी Equitable distribution च्या बाबतीत तरी समाजवादाचा हा प्रश्न आपला सुटणार नाही. तर आपल्या समाजवादापुढील प्रश्न केवळ distribution हा नसून राष्ट्रीय संपत्ती वाढवा व ती वाढत असतानाच तिचं न्याय्य विभाजन करणं हा आहे. दुर्दैवाने गेल्या २२ वर्षांच्या काळामध्ये समाजवादाची चर्चा करीत असताना आणि ऐकत असताना आपल्याला असं वाटत आहे की जस काही हा केवळ विभाजनाचा प्रश्न आपल्यासमोर उभा आहे. distribution justice हाच फक्त या समाजवादाचा मूलभूत महत्वाचा प्रश्न आहे. अशा पद्धतीत आपण चर्चा करतो आहोत. मला असे वाटते यूरोपमधील समाजवाद व आपल्या देशातील समाजवाद व आशियामधील समाजवाद यामध्ये मूलभूत फरक हा आहे. हा फरक या संदर्भात लक्षात ठेवला पाहिजे. आपण राष्ट्रीय संपत्ती वाढविल्याशिवाय आणि तिचं विभाजन केल्याशिवाय आपल्या देशातील समाजवाद खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकणार नाही. हे मुद्दाम आपण लक्षात घेतलं पाहिजे कारण आपल्यासारख्यांचा चेहरा केवळ Equitable distribution justice याच दिशेने वळलेला आहे. जसं काही तेवढाच एक प्रश्न आपल्यापुढं आहे. ! या देशामध्ये प्रचंड संपत्तीचा

साठा आहे. आणि एकदा distribution चा प्रश्न मिटला की आपल्या देशात समाजवाद आला. अशा पद्धतीची भाषणं, अशा पद्धतीची चर्चा ही मूलतः सदोष आहेत. मूलतः त्यामध्ये कांही अपुरेपणा आहे असं मला वाटतं आणि म्हणून मी आपलं लक्ष इकडे वेधू इच्छितो. आणि आपल्याला राष्ट्रीय संपत्ती वाढवावयाची असेल तर आपली राष्ट्रीय संपत्ती दोनच क्षेत्रांत आहे. त्यांपैकी एक शेतीमध्ये आहे. जवळ जवळ ५०% म्हणजे निम्मी राष्ट्रीयसंपत्ती केवळ शेतीमधून येते. तेव्हा आपली ही राष्ट्रीय संपत्ती वाढवावयाची असेल तर शेतीचे उत्पादन वाढवणं हाच एक मार्ग आर्ग आहे. हा एक अत्यंत महात्वाचा मार्ग आहे दुसरा एक जो मार्ग आहे तो उद्योगधंद्यांमधून, बँकांमधून, कारखान्यातून राष्ट्रीयसंपत्ती वाढविणे हा आहे. त्यामध्ये जी आपली राष्ट्रीयसंपती आहे. ती २५% च्या जवळपास आहे. कांही वर्षापूर्वी १५% ते १७% पर्यंत होती. सध्या ती २२% ते २३% तरी आहे. शेती आणि उद्योगधंदे या दोन क्षेत्रांतून राष्ट्रीय संपत्ती वाढविली पाहिजे हे मला मान्य आहे. परंतु distribution मुळं हा प्रश्न मिटणार नाही हे मला तुम्हाला सांगायचं आहे. मी तर असं म्हणंण की आपल्या समाजवादात उद्योगधंद्यांच्या बाबतीत गेल्या २६ वर्षांमध्ये जे मजूरविषयक कायदे आहेत ते अत्यंत चांगले आहेत. पण त्यांमध्ये पुढच्या काळात बदल केला पाहिजे तो हा आहे की आतापर्यंतचे जे आपले मजूर विषयक कायदे आहेत ते Welfare Oriented आहेत. मजूरांच्या जीवनामध्ये एक Welfare निर्माण व्हाव या दृष्टीने केलेही पाहिजेत. केवळ Welfare Oriented अशा तऱ्हेचे Labour legislation बनवून हे प्रश्न सुटणार नाहींत. या पुढचं सगळं जे Labour legislation आहे, ते Production Oriented बनवलं पाहिजे. उत्पादनाभिमुख अशा तऱ्हेचे कामगार विषयक कायदे आपणास केले पाहिजेत. आणि आपल्या समाजवादाची ती गरज आहे. फार महत्त्वाची अशी निकड आहे. ज्याज्यामुळे आपले उत्पादन वाढणार आहे अशा तऱ्हेचे कायदे आपणास केले पाहिजेत. पण याच्यासाठी उत्पादनाची वाढ आणि तुमच्या पगाराची वाढ याची सांगड तुम्हाला साधता आली तर साधली पाहिजे. Poductivity Proportionate Wages यांची सांगड तुम्हाला साधली पाहिजे. यापुढील काळामध्ये उत्पादन वाढेल, त्याच्यातला ८०% पैसा मजुराला दिला जाईल, याबद्दल माझी हरकत नाही. परंतु यापुढील काळातील Labour legislation हे Welfare Oriented असून चालणार नाही; तर उत्पादनाभिमुख मजूर विषयक कायदे आपल्याला करावे लागणार आहेत. उत्पादन वाढो अगर न वाढो तुम्हास मात्र इतके इतके वेतन मिळेल अशा तऱ्हेची भुमिका येथून पुढील काळामध्ये आपल्या समाजवादाला कितपत घेता येईल याबद्दल मला शंका आहे. शेतीच्या बाबतीतही मला असं वाटतं की ज्यामुळे शेतकऱ्याला अधिक काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि उत्पादन ज्यामुळे वाढेल अशा स्वरूपाचं धोरण आपलं असलं पाहिजे आणि यापेक्षा खोलामध्ये मी जाऊ इच्छीत नाही. भारतीय समाजवादामध्ये ही जी उत्पादनाभिमुख आपली भूमिका आहे ती अधिकाधिक बळकट कशी होत जात राहील हे आपल्या समोरचं एक महत्वाचं आव्हान आहे. हे जर

झालं नाही तर आपल्याला गरिबी हटवता येणार नाही आणि खऱ्या अर्थाने ससाजवाद आणता येणार नाही. दुसरी गोष्ट मला महत्वाची वाटते आहे ती भारताच्या संदर्भात आहे, आपल्यासमोर जे आव्हान आहे ते भारतीय जातिबद्ध समाजव्यवस्थेमधले आहे. इथलं आव्हान हे केवळ आर्थिक समतेचंच नाही, तर ते सामाजिक समतेचंही आहे किंबहुना जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि समाजवाद यांचा एकत्रितपणे जर विचार केला तर इथं आर्थिक समतेइतकंच जातीय समतेला महत्व आहे. अस्पृश्यता निवारणाला महत्व आहे. दुर्दैवाने आमच्या देशातले जे समाजवादी लोक होते त्यांनी मार्क्सपासून प्रेरणा घेतल्यामुळे आणि या देशातील जातीय व्यवस्था, आमची जी समाज व्यवस्था होती याचा मूलतः विचार न केल्यामुळे त्यानी सगळया प्रकारांना उत्तर एकाच म्हणजे आर्थिक समस्येमध्ये देऊन टाकले. त्यामुळे अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडं द्यावं तेवढं लक्ष दिलं गेलं नाही. अस्पृश्याचा प्रश्न हा केवळ आर्थिक प्रश्न आहे असंच ते सांगत बसले. जातीव्यवस्थेच स्वरुप मुलतः संपूर्ण आर्थिक नाही. ते एक विषमतेचं दुखणं आहे, तो एक सामाजिक रोग आहे. अस्पृश्याचं दुःख हे सामाजिक आहे. आर्थिक नाही. जर एखाद्या महारवाडयातील माणसाचा पगार ५०० रुपये असला अणि माझे उत्पन्न ५०० असते आणि मी जर खेडयात गेलो तर आर्थिक दृष्टया आम्ही जरी सारखे असलो तरी सामाजिक दृष्टया तिथं ताबडतोब फरक केला जातो. माझा जर महार समाजातील मित्र असेल तर त्याला माझ्यासारखी सामाजिक समता नाही. त्याच दुखणं आर्थिक विषमतेचं नाही, तर त्याचं दुखणं सामाजिक विषमतेतच आहे. दुर्दैवानं या भारतीय समाजवादानं हे जातीव्यवस्थेचं, अस्पृश्यतेचं दुःख मूलतः समजावून घेतलेलं नाही. सगळ लक्ष जे आहे ते आर्थिक समस्येवर केंद्रीत केलं आहे. डॉ. आंबेडकर हे समाजवादी मंडळीपासून सतत दूर राहिले. कम्युनिझमपासून दूर, खुद्द मार्क्सवादापासून दूर राहिले. त्यांनी एक महत्वाची गोष्ट सांगितली ती ही की, मार्क्सने भांडवलशाहीची मीमांसा केली असेल पण भांडवल शाहीची मीमांसा करून भारताचे प्रश्न सुटत नाहीत. इथल्या अस्पृश्यतेची मीमांसा, जातीव्यवस्थेची मीमांसा हीही त्याचे बरोबर केली पाहिजे. किंबहुना भारतीय समाजवादा-समोर आंबेडकरांच्या मतें ' दोन आव्हानं आहेत Capitalism आणि अस्पृश्यता जातीयव्यवस्था. मार्क्सच्या ग्रंथामध्ये फक्त भांडवलशाहीचे उत्तर दिलं आहे. पण अस्पृश्यतेचं उत्तर दिलेलं नाही. आणि इथं जे जे समाजवादी होते ते पोथीनिष्ठ होते. पुस्तकी होते. सैद्धांतिक होते. ठोकळेबाज होते. त्यामुळे त्यांना खेडयापाडयातील मांगवाडे दिसले नाहीत खेडयापाडयातील जातीयव्यवस्था दिसली नाही. आपल्याकडे सामाजिक-समतेसाठी ज्या चळवळी झाल्या त्याकडेही त्यांनी पाठ फिरवली आणि अशा तऱ्हेचा जो समाजवाद आहे त्याला या मातीमध्ये मुळेच मिळाली नाहीत. It has no roots in the soil. त्यामुळे आंबेडकरांसारख्या माणसाची जी टीका आहे ती मला मूलभूत योग्य वाटते. इतकेच नव्हे तर त्या काळामध्ये त्यांनी सगळयाच प्रश्नांचे ज्याला इंग्रजीमध्ये Over Simplified म्हणतो Over Simplification असे केल आहे. हिंदू मुसलमानांचे दंगे हा देखील आर्थिक प्रश्नांचा आविष्कार आहे असं सांगायला त्यांनी सुरुवात केली. हिंदू-मुसलमानांचे

दंगे यांचे स्वरुप मूलतः काही आर्थिक नाही. कोणताही एक भांडवलदार कोठेतरी एक मजूर असा प्रकार नाही. आहे, मार्क्सवाद तो ही सर्व प्रकारची मास्टर की आहे. जगातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचा हा एक तत्त्वज्ञान्यांचा प्रयत्न आहे. मग भारताची अस्पृश्यता असो, अमेरिकेतला वंशवाद असो वा अमेरिकेमधले वंशवादाचे तत्त्वज्ञान असो, काहीही असो ! पण आंबेडकरांना मूलभूत उणेपणा दिसला. आंबेडकर हे कम्युनिझमपासून व समाजवादापासून दूर राहिले. या समाजवादी मंडळींच्या जवळपास ते कधी गेले नाहीत. कारण त्यानी सांगितलं की या देशातील समाजवाद, या देशातील समाजव्यवस्था, या देशातील दुखणी तुम्हाला समजलीच नाहीत, तुम्ही पोथीनिष्ठ झालात. तुम्ही मार्क्सचे ग्रंथ वाचता आणि प्रत्येक प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न करता आहात. ही आंबेडकरांची टीका मला अत्यंत योग्य वाटते. यापुढील काळातदेखील भारतीय समाजवादाला जे आव्हान आहे ते केवळ भांडवलशाहीचे नाही, तर अस्पृश्यता, सामाजिक नीति, जातीयव्यवस्था ही देखील तितकीच बलवत्तर आव्हानं आहेत. या समाजवादानं हे आव्हान स्वीकारले नाहीतर भारतीय समाजवादामध्ये काहीतरी उणिवा राहिल्या आहेत असे म्हणावं लागेल. ही गोष्ट मला अत्यंत महत्त्वाची वाटते. हे भारतीय समाजवादाचं दुसरं वेगळेपण आहे. कारण जातीय व्यवस्था फक्त भारतीय भूमीतच जन्माला आली आहे. अशाप्रकारची जातीयव्यवस्था जगाच्या पाठीवर कोठेही सापडणार नाही. खास भारतीयत्व कशात असेल तर या महारवाड्यामध्ये आहे. आमच्या मांगवाड्यामध्ये आहे. आमच्या बौद्धवाड्यामध्ये आहे. जातीय व्यवस्थेमध्ये आहे. आणि समाजवादाने हेही आव्हान स्वीकारलं पाहिजे. आणि तिसरी गोष्ट अशी की भारतीय समाजवादावर या देशातल्या गांधीवादाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. ही गांधीवादाची गोष्ट जगातल्या कोणत्याही राष्ट्रात दिसून येणार नाही. भारतीय समाजवादावर फार मोठ्या प्रमाणात गांधीवादाचा पगडा पडला आहे, त्याचं कारण असं आहे की समाजवाद येथे १९३३।३४ च्या सुमारास उदयास आला. या देशामध्ये समाजवादी पक्ष म्हणून आला तो विचार देखील २/४ वर्षे अगोदर आला. पण ज्यावेळेस समाजवाद येथे जन्मास आला त्या काळामध्ये गांधीवादाचा प्रभाव हा या देशामध्ये शिगेस पोहचला होता असं माझं प्रामाणिक मत आहे. गांधींच्या काही विचाराशी माझे जरूर मतभेद आहेत. गांधीचे सगळेच्या सगळे तत्त्वज्ञान मला मान्य नाही. पण गांधींच्या विचारामधला काही जो भाग आहे, हा इतका मोठा आहे की गांधी मला फार मोठे पुरुष वाटतात. मानवी इतिहासामधले जे २।४ पुरुष मोठे वाटतात त्यामध्ये गांधी आहेत. त्यात सॉक्रेटिस, बुद्ध, गांधी ही अशी माणसे आहेत की ते मानवी इतिहासातले उंच सुळके आहेत. गांधी-सारखे फार मोठे थोर पुरुष आपल्या देशात झालेले आहेत. मला फार मोठं भाग्य वाटतं या देशाचं. गांधींचे संतती नियमनाबद्दलचे विचार मला मान्य नाहीत. गांधींचा ब्रम्हचर्या विषयीचा जो गाढा विश्वास आहे तो मला मान्य नाही. Familyplanning साठी गांधीवाद अपुरा पडतो आहे. पण गांधींच्या विचाराचा जो गाभा आहे, त्यांचे जे शाश्वत विचार आहेत हे फार

मोठे वाटतात. ज्याप्रश्नाची उत्तरे मार्क्समध्ये मिळालेली नाहीत, त्याची उत्तरे मला गांधीवादा-मध्ये मिळालेली आहेत. गांधीवादामध्ये मानवतावादाला आणि माणसामधल्या सत्तप्रवृत्तीला आव्हान करण्याचा जो भाग आहे तो मार्क्समध्ये नाही. मार्क्सिझममध्ये दोन प्रेरणा आहेत. एक नैतिक प्रेरणा आहे. माणसाला आर्थिक न्यायाची एक नैतिक प्रेरणा आहे. पण त्याचबरोबर मार्क्समध्ये माणसामधली जी एक असूया आहे, जो एक द्वेष आहे, जो एक हेट्रेड आहे त्यालासुद्धा आव्हान आहे. त्यामुळे मार्क्सवादामध्ये जे आव्हान आहे ते संमिश्र आहे. त्याच्यामधला काही भाग नैतिक प्रेरणेचा आहे. पण त्याचबरोबर त्यांच्या मधला काही जो भाग तो आहे. माणसामधली असूया, माणसामधला द्वेष, माणसामधला काही विध्वंसक भाग आहे यालाही त्याच्यांमध्ये आव्हान आहे. म्हणूनच या प्रेरणा संमिश्र आहेत. गांधीवादाच्या प्रेरणा अत्यंत थोर, विशुद्ध अशा नैतिक स्वरूपाच्या मानवी प्रेमाच्या आहेत. अत्यंत थोर अशा नैतिक प्रेरणा आहेत. आणि मला गांधीवाद आणि गांधी मार्क्सपेक्षा मोठे वाटतात, येशूख्रिस्तापेक्षा सुद्धा गांधींचा वेगळेपणा आहे येशूख्रिस्ताच्या सर्व तत्त्वज्ञानांचा पाया जर काय असेल तर Man is essentially Sinful. माणूस हा मूलतःच पापी आहे. आणि मग त्याच्यावर सारखे संस्कार केले पाहिजेत, नाही. तर तो सारखा पापाकडे धावेल हा येशूच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे–गाभा आहे गांधींच्या तत्त्वज्ञानाचा गाभा बरोबर उलटा आहे. माणूस हा मूलतः सत्प्रवृत्ती आहे. माणूस हा मूलतः ईश्वराचा अंश आहे. त्याच्या सत्प्रवृत्तीला नुसते आव्हान करा, त्याच्यातील परमेश्वर झटकन जागा होईल. म्हणजे गांधीजींची भूमिका येशूख्रिस्तांच्या भूमिकेच्या बरोबर उलटी आहे. अगदी वेगळी आहे. आणि त्यामुळे येशूख्रिस्ताचे तत्त्वज्ञान मला वेगळं वाटतं आणि समाजवादाचा उदय ज्यावेळी या देशात झाला होता त्याचवेळी गांधीवादाचा प्रवाह या देशात झाला झिरपला पोहचलेला होता. गांधीवादाच्या प्रेरणांची उदाहरणेच मी तुम्हाला सांगतो, ब्रिटीश साम्राज्यशाहीविरूद्ध झुंजा घेतली, देशातील लाखो लोकांना साम्राज्यशाहीविरुद्ध झुंज घ्यायला लावली. गांधींच्या सर्व चळवळीतलं जर कोणतं सूत्र असेल तर ब्रिटीश साम्राज्य शाहीविरूद्धची आपली झुंज हे आहे ब्रिटिश माणसांच्या विरूद्ध नाही. गांधी नेहमी असं म्हणत असत की "We should not hate the sinner, we must hate the sin" म्हणजे पापाचा तिरस्कार तुम्ही करा, परंतु पापी माणसाचा तिरस्कार करू नका. त्या प्रमाणात ब्रिटीश Emperialism आणि Britishman यांच्यात गांधींनी फरक केला. आणि त्यामुळे ब्रिटीशद्वेशाला आमच्या चळवळी मध्ये कुठही स्थान नव्हतं. इतकंच नव्हेतर ब्रिटीश साम्राज्य नष्ट झाल्यानंतरचा पहिला गव्हर्नर जनरल जो आम्ही निवडला तो 'माऊंट बॅटन' ब्रिटीश माणूस होता. जगातल्या इतिहासातील हा एक चमत्कार आहे त्याचं कारण गांधींचं नेतृत्व आम्हाला लाभलं होतं. त्यामध्ये असूयेला, द्वेषाला, विध्वंसक प्रवृत्तीला अजिबात स्थान नव्हते. गांधीवादाच्या प्रभावाच्या छायेखाली हे समाजवादाचं रोपट वाढत होतं आणि आश्चर्य असं की गांधींच्या मृत्यूनंतर गांधीवादाचा प्रभाव समाजवादावर अधिक पडत चालला. त्याची दोन तीन उदाहरणं मी आपल्याला देतो. पहिली

गोष्ट अशी आहे की या देशातल्या समाजवाद्याचा लोहियांनी एक सिद्धांत मांडला होता. पंचमढीला. त्यांनी सांगितलं की जगामधल्या सगळ्या समाजवाद्यांचा आग्रह काय असेल तर Heavy Industrialization, महायंत्रोत्पादनावर त्यांचा भर आहे. प्रचंड स्वरुपाची यंत्रे उभी करा. महायंत्रोत्पादन हे समाजवादाचं एक सूत्र आहे. असा त्यांचा आग्रह आहे. इथे समाजवाद्यांचा आग्रह आहे की छोटया छोटया प्रकारची यंत्रं तुम्ही निर्माण करा. औद्योगिक क्रांतीसाठी Small Scale Indutries वर त्यांचा भर आहे. छोटया छोटया प्रकारची यंत्रं तुम्ही निर्माण करा जी दोन माणसं चार माणसं चालवू शकतील. आशाप्रकारचा आग्रह आहे. तो गांधीवादातून आलेला आहे. जगातल्या कोणत्याही समाजवादामध्ये तुम्हाला अशा तऱ्हेची भूमिका सापडणार नाही. हा गांधीवादाचा प्रभाव आहे, दुसरा गांधीवादाचा प्रभाव विकेंद्रीकरणाचा आहे, समाज- वादाची मूळप्रवृत्ती जी आहे ती सगळ्या जगभर सत्ता केंद्रीकरणाकडे आहे राज्यसरकारच्या हातामध्ये सगळी सत्ता केंद्रित करायची आणि आर्थिक व राजकीय सत्ता केंद्रित झाल्या की सर्व सत्तांचे केंद्रीकरण होतं. किंबहुना आर्थिक सत्ता हे सगळ्या सत्तेचं मूळ आहे. मार्क्सने जे म्हटलेलं आहे, ते काही बाबतीत खरं आहे. ' आर्थिक सत्तेवरचं नियंत्रण हे मानवी जीवनावरच नियंत्रण असतं, पैशाच्या थैलीवरचं नियंत्रण हे जवळ जवळ सगळ्या जीवनावरचं नियंत्रण असतं हे पुष्कळसं खरं आहे. ते जगातल्या इतर देशातील राजकारणातसुद्धा आप- ल्याला दिसेल United Nations वर जगातल्या बडया राष्ट्रांचा प्रभाव आहे, राष्ट्रामध्ये सुद्धा भांडवलवाल्याचा प्रभाव असतो, तो मुख्यतः पैशाच्याद्वारे असतो. आणि त्याच्या जोडीला राजकीय सत्ता गेली की त्या दोन्ही सत्तांचं केंद्रीकरण विलक्षण होतं परंतु. जगातल्या सगळ्या समाजवाद्यांच्यामध्ये मूळ आग्रह जो आहे तो सत्ता केंद्रित करण्याचा. गांधीच्या प्रभावामुळे भारतीय समाजवादामधला जो आग्रह आहे हा सत्ताविकेंद्रीकरणाचा आहे. इथल्या समाजवाद्यांचा तर अधिक आहे. जिल्हा परिषदांकडे सत्ता द्या, ग्रामपंचायतीकडे सत्ता द्या पंचायत समित्यांकडे सत्ता द्या. आणखी सत्ता विकेंद्रीकरण करा. हा सत्ता विकेंद्रीकरणाचा जो मूलमंत्र आहे, हा गांधीवादातून या समाजवाद्यांच्यामध्ये आला ही चांगली गोष्ट, आणि तिसरी गोष्ट सत्याग्रह करणारी मंडळी तुम्हाला कोठेही सापडणार नाहीत. अर्थात या सत्याग्रहाचा कधी कधी अतिरेक होतो. नको इतका त्याचा अतिरेक होतो. आणि याचं मूळ अर्थातच लोहियांच्या विचारातच आहे, लोहियांबद्दलचं मी काही फार विवेचन करीत नाही.

पण लोहिया एक मोठे विचारवंत होते यात शंका नाही. पण कधी कधी ते कसे एका टोकाला जात होते याचं मी आपणाला फक्त एकच उदाहरण देतो १९५३ / ५४ साली लोहियांनी एक अशातऱ्हेचा सिद्धांत मांडला होता की Theory of irrelevance, Equal

irrelevance म्हणजे या देशातले सगळे जे राजकीय पक्ष आहेत ते irrelevant आहेत समाजवाद आणायला. समाजवाद कुणी आणूच शकत नाही, समाजवादीपक्ष जो आहे हाच फक्त समाजवाद आणू शकेल. काँग्रेसही आणू शकणार नाही. दुसरा कोणताही पक्ष आणू शकणार नाही. आणि त्यामुळे त्यांनी Equidistance Theory मांडली होती. सगळ्याच राजकीय पक्षापासून तुम्ही समान अंतरावर राहा अशा तऱ्हेचा आदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला होता. Equidistance Theooy. सगळ्यांच्या पासून समान अंतरावर राहायचं. कोणालाही जवळ येऊ द्यायचं नाही. कोणाच्या जवळ जायचं नाही. कारण ते सगळेच irrelevant आहेत. अशातऱ्हेचा त्यांनी एक सिद्धांत मांडला होता. १९६४ साली त्यांनी असा एक सिद्धांत मांडला की भारतातील कोणत्याही पक्षाबरोबर तुम्ही समझोता करा आणि काँग्रेसला विरोध करा. कोणत्याही म्हणजे अगदी नक्सलवाद्यांशीही सहकार्य करा. डाव्या कम्युनिस्टांशी करा. जातीय-वाद्यांशी करा, पटेल त्या पक्षाशी सहकार्य करा आणि काँग्रेसला विरोध करा. ५४ साली जे लोहिया सांगत होते की, कोणत्याही पक्षाबरोबर आम्हाला सारख्याच अंतरावर राहायचं आहे. हेच लोहिया ६४ सालामध्ये सांगायला लागलेत की, जगातील वाटेल त्या शक्तीबरोबर सहकार्य करा, आणि काँग्रेसला विरोध करा. आणि त्याच्यातून पुढे काय निर्माण व्हायचे ते झालं पण सत्याग्रहांचा अतिरेक जो आहे तो वाईटच आहे. गांधीच्यामध्ये सत्याग्रहाची जी एक मूळ कल्पना होती की माणसातला परमेश्वर जागा करावा. माणसातल्या सत्प्रवृत्ती जाग्या कराव्यात, त्याचा हृदयपालट करावा, त्याचं मनःपरिवर्तन करावे ते आत्मक्लेशामधून ही भूमिका गेली आणि लोहीयांनी सत्याग्रह हे एक राजकीय हत्यार म्हणून वापरायला सुरुवात केली. आणि त्यामुळे त्यामागील प्रेरणा व स्वरुपात मूलभूत बदल झाला. तो इतिहास वेगळा आहे. पण गांधीवादाचा प्रभाव या देशातील समाजवाद्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर झाला आहे, तो इतका की, समाजवादी कधी कधी गांधीवादाहूनही अधिक गांधीवादी आहेत असं वाटू लागतं इतका तो प्रभाव पडलेला आहे. मला स्वतःला भारतीय समाजवादाच्या संदर्भामध्ये हा जो प्रभाव आहे त्यांतील काही भाग जो आहे तो चांगला आहे असं वाटत. त्यातील सत्ता विकेंद्री-करणाचा भाग जो आहे तो चांगला आहे. तो छोटया छोटया उद्योगधंद्यांवर जो आपला भर आहे. आणखीही दिला गेला पाहिजे. शेतीवर आपला आणखी अधिक भर असला पाहिजे. यूरोप-मध्ये केवळ औद्योगिकरणापासून प्रश्न सुटलेले होते, आपल्या सबंध अर्थव्यवस्थेचा कणा शेती हा आहे. इंग्लंडमधल्या एक प्राध्यापिका आल्या होत्या काही वर्षांपूर्वी पुण्याला. त्यांनी सांगि-तलं की बुवा! तुमच्या देशामध्ये मी अनेक लोकांना भेटले आहे. प्रत्येकजणाला या उद्योग-धंद्याचे आणि कारखान्याचे इतके विलक्षण आकर्षण आहे की शेती हा तुमच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे असं काही दिसतच नाही. तुमच्या लोकांच्या बोलण्यावरुन वगैरे ह्या ७।८ वर्षां-

पूर्वीची गोष्ट आहे. ६५ नंतर आपण शेतीकडे आणखी जास्त लक्ष द्यायला सुरुवात केली. पण त्यावेळेला काव्यमय वर्णन केललं होतं की ज्या देशातील ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत, आणि ज्या देशातील ५०% राष्ट्रीय संपत्ती ही शेतीमधून येत आहे. अशा देशामध्ये शेतीला फार मोठे महत्त्वाचे स्थान आहे. आणि त्यानी सांगितल होत की खरोखर तुमच्यासारख्या देशामध्ये या धूर ओकणाऱ्या गिरण्या, या गिरण्यांच्या चिमण्या ज्या आहेत. यांच्यापेक्षां वाऱ्याच्या झुळकेबरोबर शेतामध्ये डोलणारे शेतीमधील पिके जास्त आहेत. जी कणसं आहेत ती तुमच्या वैभवाची खरी प्रतीकं आहेत, आणि ते अगदी खरं आहे, आणि आपला संबंध जो विकास आहे, आपल्या समाजवादाला यापुढे जर काही लक्ष द्यावयाचं झालं तर शेतीविकासाकडे अधिक लक्ष द्यावं लागणार आहे, ही मला फार महत्त्वाची गोष्ट वाटते आहे. आणि भारताच्या संदर्भात मला आणखी एक अशी महत्त्वाची गोष्ट वाटते आहे की आपला समाजवाद जो आहे तो कोणत्याही प्रकारचा सैद्धांतिक भूमिका घेऊन चालणारा असा नाही, तो वास्तववादी असला पाहिजे तो व्यवहारवादी असला पाहिजे, कारण समाजवाद म्हणजे काही विशिष्ठ तत्त्वांचा सांगाडा नव्हे. समाजवाद म्हणजे शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याची ती एक पद्धति आहे. It is a mode of thinking, काही ठोकळेबाज सिद्धांतांचा सांगाडा म्हणजे समाजवाद नव्हे, समाजवाद म्हणजे सामाजिक आर्थिक प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याची एक पद्धती आहे. नेहरुनी याच अर्थाने समाजवादाचा स्वीकार केलेला होता, नेहरुनी याच अर्थाने समाजवादाचे विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे आपल्याला आपल्या परिस्थितीकडेच या देशाचे भूमीकडे इथल्या समाजव्यवस्थेकडे पहात पहातच समाजवादाचा स्वीकार करायचा आहे. त्यांमुळे समाजवादाबद्दलच्या कोणत्याही आग्रही भूमिका, ठोकळेबाज भूमिका ह्या घेणे मला आवडत नाही. कारण, " Theory is green, but evergreen is the tree of life. " हे नेविनचं वाक्य मोठं अर्थपूर्ण आणि छान आहे. सिद्धांत हे हिरवेगार असतात परंतु जीवनाचा वृक्ष हा सदासर्वकाळ हिरवागार असतो. त्यामधून प्रेरणा जर घ्यावयाची असेल तर आपणाला जीवनाकडे " सदासर्वकाळ हिरवागार असणारा वृक्ष आहे " या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे आणि या दृष्टीने आज जगामध्ये राष्ट्रीयीकरणासंबंधीचा जो अतिशय उत्साह ओसरत चाललेला आहे. हा का ओसरत चाललेला आहे या संबंधी आपणाला विचार केला पाहिजे. आणि केवळ मालकी हक्क बदलून प्रश्न जर सुटत असतील तर ते तसे सोडवले पाहिजेत पण केवळ तेवढ्यानेच जर समाजामध्ये बदल होत नसेल, त्याच्यामधले दारिद्र्य जर हटत नसेल तर याच्याही पलिकडे जाऊन इतर कांही मार्गांचा शोध घ्यावा लागणार आहे. पुढच्या दशकामध्ये आपल्या समाजवादाला खरोखर महत्वाची ३।४ अशी आव्हानं आहेत. पहिलं आव्हान जे आहे ते अस्पृश्यतानिवारणाचं आहे. दुसरं जे आव्हान आहे, ते शहरातील slums गलिच्छ वस्तीत राहणारी लाखो माणसं,

त्या गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करणं. तिसरं आव्हान फार मोठं आहे, खेड्यापाड्यातील शेतमजूर वर्ग आहे. की ज्याला दिवसाकाठी कसेबसे २/२॥ रुपये मिळतात आणि ज्याला वृद्धापकाळाची काही शाश्वती देखील नाही ह्या शेतमजूर वर्गाचे फार मोठं आव्हानं आहे. बेकारीचा प्रश्न आहे. त्यामुळे पुढचं दशक हे अस्पृश्यता, अस्पृश्यांचा प्रश्न शेतमजूराचा प्रश्न आहे, गलिच्छ व रस्त्यांमध्ये राहणारे लोक, शेकडो हजारो लोक लाखो लोक ज्यांचेवर बेकारीचा प्रसंग आलेला आहे. असे ते बेकार, बेकारींची कुऱ्हाड ज्यांचेवर कोसळलेली आहे असे लोक. या लोकांच्या प्रश्नांनी पुढचं दशक भरलेलं आहे. आणि भारतीय समाजवादाला या लोकांचे प्रश्न कसे सोडविता येतील या संदर्भात विचार करायचा आहे आणि यासाठी जी काही वास्तव भूमिका असेल ती आपल्याला स्वीकारावी लागेल. काही ठोकळेबाज भूमिका असतील तर त्या बाजूला ठेवाव्या लागतील त्यांच्यात काही बदल करावा लागेल, कारण नेव्हिनचं जे वाक्य आहे ते आपण लक्षात घेतले पाहिजे कारण सिद्धांत जे आहेत सदासर्वकाळ जरी कितीही हिरवेगार असले तरी जीवनाचा वृक्ष हा सदासर्वकाळ हिरवागार असतो. आणि आपल्याला जी प्रेरणा घ्यायची आहे. आणि इतकच सांगून समाजवादाचं स्वरूप हे बदलत आलेलं आहे. २० व्या शतकाच्या शेवटी शेवटी तर समाजवादाचं स्वरूप पुष्कळ बदलणार आहे. मी स्वतः समाजवाद एक साधन आहे असं मानणारा आहे, गरीब माणसाचे जीवन बदलण्याचे ते एक साधन आहे. आणि मुख्य उद्दिष्ट जर काय असेल तर प्रत्येक व्यक्तीचा विकास झाला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचं दारिद्र्य हटल पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचा विकास – कारण मानवी जीवन हे पवित्र आहे. आणि उद्दिष्ट जर काय असेल, साध्य जर काय असेल तर प्रत्येक व्यक्तीचा विकास आहे. समाजवाद माझ्या दृष्टीने साधन आहे; साधनात जर काही थोडाफार बदल कराल तर तो जरूर केला पाहिजे उद्दिष्टात– साध्यामध्ये मात्र बदल होता कामा नये. कारण माणूस हा सगळ्या समाज-संस्थाचा निर्माता आहे. माणसानं या सगळ्या समाजसंस्था निर्माण केलेल्या आहेत. धर्मसंस्था अर्थसंस्था, राज्यसंस्था ह्या सगळ्या ज्या कल्पना आहेत, हा माणूस आहे. त्यान निर्माण केलेली ही त्याची साधनं आहेत त्यामुळे निर्माता आणि निर्माण केलेली साधनं याचा जो संबंध आहे. Relations आहेत ते लक्षात घेतले पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीचा विकास हा शाश्वत विचार आहे माझ्या मते, प्रत्येक व्यक्तीमध्ये ज्या काही सुप्तशक्ती आहेत या सुप्तशक्तिचा आविष्कार करणं हे अंतिम साध्य आहे. मानवी इतिहासात एक मार्गदर्शक तत्त्व जर कोणतं असेल तर व्यक्तीचा विकास–प्रत्येक व्यक्तीच्या सुप्त शक्तीचा आविष्कार हे आपलं मार्गदर्शक तत्व आहे. आणि महा–सागरातल्या एकाद्या दिपगृहाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार हे तत्त्व आहे समाजवादाची ही मीमांसा करताना मी प्रत्येक व्यक्तिचं जीवन त्याच्यामध्ये किती समृद्ध होणार आहे. त्याच्या जीवनात किती स्वातंत्र्य मिळणार आहे. त्याच्या जीवनातील किती दारिद्र्य कमी होणार आहे हा

निकष लावून मी समाजवादी तपाशीन, लोकशाही तपाशीन आणि मी इतर भांडवलशाही तपाशीन, कम्युनिझमशाही तपाशीन. सगळ्याच तत्वज्ञानाचा निकष माझा जर कोणता असेल तर प्रत्येक व्यक्तींचं जे जीवन पवित्र आहे या पवित्र जीवनाचा विकास किती होतो आहे. हा माझा निकष आहे. आणि भारतीय समाजवादाचा विचार करताना देखील हे मूलभूत निकष आहेत. मानदंड आहेत. व्यक्ती सगळया गोष्टींचा मानदंड आहे. हे जे मुलभूत तत्त्व आहे हे लक्षात घेऊनच यापुढच्या दशकामध्ये आपणास आपल्या समाजवादाचा विचार करावयाचा आहे. इतकं सांगून आपण शांतपणाने माझे व्याख्यान ऐकून घेतले. या बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

* * *



३) व्याख्यान तिसरे

## प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदार, पुणे.

# विषय- " भारतीय राष्ट्रवाद आणि ऐहिकनिष्ठा "

## दिनांक : १४ । ३ । १९७३



# भारतीय राष्ट्रवाद आणि ऐहिकनिष्ठा

व्याख्याते गंगाधर बाळकृष्ण सरदार

नगराध्यक्ष श्री. पी. डी. पाटील, श्री. शंकरराव करंबेळकर आणि बंधुभगिनीनो. प्रथमतः केळकर जन्मशताब्दीच्या निमित्त येथे आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेमध्ये ज्या विद्यार्थीनी पारितोषिके मिळविली, त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपण ही व्याख्यानमाला आयोजित केलेली आहे. हा उपक्रम मला स्वतःला अतिशय औचित्यपूर्ण असा वाटतो. भारतातील आजच्या मान्यवर राजकीय नेत्यांमध्ये तात्त्विक विचारांबद्दल ज्यांना अत्यंत खोल आणि उत्कट अशी आस्था आहे अशा नेत्यांपैकी मा. यशवंतराव हे एक आहेत. तेव्हा त्यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने जी काही योजना करावयाची, तिच्यामध्ये ज्ञानप्रसाराला आणि विचार-मंथनाला महत्वाचे स्थान असणे निःसंशय आवश्यक आहे. आपले राष्ट्र सध्या एका कठीण अशा परिस्थितीतून जात आहे. त्यादृष्टीने पुढील पाचदहा वर्षे फार महत्वाची आहेत. या दहावर्षांत आपल्या समाजाला वेगवेगळ्या दिशांनी वळण लावण्याचे जे प्रयत्न होतील, त्यावर आपल्या राष्ट्राची प्रगती आणि येथील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. आजच्या व्याख्यानासाठी 'भारतीय राष्ट्रवाद आणि ऐहिकनिष्ठा' हा विषय मी बुद्धि पुरःसर निवडलेला आहे. हा विषय केवळ चर्चेचा नाही. आपल्या राष्ट्रीय जीवनाशी त्याचा खूप जिव्हाळ्याचा संबंध आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून आपल्या नेत्यांनी जो ध्येयवाद मनोमन स्वीकारला तो आता आपल्या राष्ट्राच्या घटनेमध्ये अंतर्भूत झाला आहे. तो साकार व्हावयाचा असेल, तर प्रस्तुत विषयावर सखोल चिंतन

व चर्चा करून आपणांस काही निर्णय घ्यावे लागतील. ह्या विषय फार कठीण, गुंतागुंतीचा आणि वादग्रस्त आहे. त्याबाबत मतभेद होणे स्वाभाविक आहे. त्यासंबंधी जे विचार मी आपल्या समोर मांडणार आहे, ते आपल्याला लगेच मान्य झाले पाहिजेत असा माझा आग्रह नाही. हे केवळ एक प्रगट चिंतन आहे. एकमेकांशी संवाद साधण्याची ही धडपड आहे. म्हणून वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करून माझी जी मते बनली आहेत, ती मी आज प्रांजलपणे आपल्यासमोर ठेवणार आहे.

आज आपल्या देशात फुटीरपणाची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. प्रांतीयता, जातीयता, संकुचित धर्मनिष्ठा अशा राष्ट्रविघातक जाणिवांना ऊत आला आहे. यामधून आपले राष्ट्र बलवान आणि ऐश्वर्यसंपन्न होणार नाही. उलट आपली लोकशाही या संकुचित जाणिवांच्या योगे धोक्यात येईल. केवळ ऐहिकनिष्ठेची मी आज चर्चा करणार नाही. ' भारतीय राष्ट्रवाद आणि ऐहिकनिष्ठा, हा आजचा माझा विषय आहे. या दोन्ही संकल्पनांचा आशय प्रथम स्पष्टपणे समजून घेतला पाहिजे. ही आधुनिक काळात सर्वत्र स्थिरावलेली अशी एक युगकल्पना आहे. आंतरराष्ट्रवादाचा तोंडाने सतत उद्घोष करणारे रशिया आणि चीन यांच्यासारखे देश घेतले, तरी प्रत्यक्षात त्यांची धोरणे राष्ट्रवादीच असतात सामूहिक जीवनात प्रत्येक माणसाला अनेक वेगवेगळे ऋणानुबंध असतात, निरनिराळ्या निष्ठा असतात. प्रत्येक मनुष्य एकाचवेळी कुटुंब, जात, गाव, प्रांत, धर्म या सर्वांचा घटक असतो. या सर्वांबद्दल त्याच्या मनात आपुलकीची भावना असते. त्यांचे हितसंबंध या निर्घृण जीवनसंघर्षात कसे सुरक्षित राहतील याची त्याला दक्षता घ्यावीशी वाटते. या निरनिराळ्या निष्ठांमध्यें सुसंवाद साधणे हे सुसंस्कृत नागरिकाचे लक्षण आहे. या निरनिराळ्या प्रेरणांचा एकमेकांना छेद जाऊ लागला, तर त्यामधून दुःख आणि आपत्ती ओढवतात. मानवी मनातील या निरनिराळ्या निष्ठांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी, त्याच्यामधील तारतम्य सांधण्यासाठी त्या त्या काळातील मूलभूत निष्ठेचा प्रथम शोध घेतला पाहिजे. अगदी प्राचीन काळी जमात हाच मानवी समाजातील प्रमुख गट होता. तेव्हा जमातनिष्ठेला आग्रस्थान मिळणे स्वाभाविक होते. मध्ययुगामध्ये समाजजीवनाला धर्माचे अधिष्ठान होते. आधुनिक काळात राष्ट्र हेच मानवी समाजाच्या संघटित जीवनसरणीचे प्राणतत्व आहे. म्हणून राष्ट्रनिष्ठा हाच आजचा युगधर्म आहे. प्रत्येकाने आपल्या कुटुंबाच्या, जातीच्या, प्रांताच्या हिताचा विचार अवश्य करावा, भाषेच्या विकासाची चिंता बाळगावी पण ते करताना राष्ट्राचे स्थैर्य आणि हितसंबंध धोक्यात येणार नाहीत याची काळजी घेणे हे त्याचे कर्तव्य आहे. आता राष्ट्रीयत्व ही आजची मध्यवर्ती कल्पना आहे असे आपण म्हणतो, तेव्हा हे लक्षात ठेवले पाहिजे की राष्ट्रवाद हे काही एकाच स्वरूपाचे साचेबंद असे सामाजिक तत्त्वज्ञान नाही. निरनिराळ्या ठिकाणी राष्ट्रवादाचा आशय वेगवेगळा असल्याचे दिसून येते. राष्ट्र हा जीवनाचा मध्यबिंदु कल्पून त्या भोवती गुंफलेले तत्त्वज्ञान म्हणजे राष्ट्रवाद. हा राष्ट्रवाद कुठे आक्रमक असेल, तर कुठे शांततावादी असेल. कुठे धर्माधिष्ठित असेल तर कुठे धर्मनिरपेक्ष असेल. काही देशांत राष्ट्रवादाला हुकुमशाही अधिष्ठान असेल. आजच्या जगामध्ये या सर्व प्रकारचा राष्ट्रवाद आपणांस दिसून येतो. भारतीय राष्ट्रवादाचा उदय येथील स्वातंत्र्याच्या चळवळीतून झाला आणि तिच्यातून त्याला एक विशिष्ट वळण लागले. या स्वातंत्र्यसंग्रामामागील ज्या प्रेरणा होत्या, त्यामधूनच भारतीय

संविधानाची निर्मिती झाली आहे. घटनेने प्रत्येक माणसाला काही मूलभूत हक्क दिलेले आहेत. ' Secularism ' किंवा ' इहवाद ' हे आपल्या या घटनेला पायाभूत असलेले एक तत्त्व आहे. यालाच धर्मनिरपेक्षता असेही म्हणतात. आपल्या देशात हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, बौद्ध, जैन असे नाना धर्माचे व पंथाचे लोक आहेत. त्यांच्यामधे भेदभाव न करता घटनेने सर्वांना सारखे हक्क दिले आहेत. याचाच अर्थ हा की आपल्या देशाचे नागरिकत्व जातिधर्मनिरपेक्ष असे आहे. आता सेक्युलॅरिझम. किंवा ऐहिकनिष्ठा या कल्पनेबाबतही पुष्कळदा आशयासंबंधी अनिश्चितपणा दिसून येतो. ऐहिकनिष्ठा म्हणजे धर्मविरोध नव्हे. सर्व धर्मसमभाव असाही त्याचा अर्थ नव्हे. शासनाला स्वतःचा असा कोणताच धर्म नाही. धर्मावरून शासन नागरिकामध्ये भेदभाव करणार नाही. उलट प्रत्येक धर्माला व संस्कृतीला शासनाचे संरक्षण मिळेल असे स्पष्ट आश्वासन घटनेने भारतातील नागरिकांना दिलेले आहे. पण शासन धर्मनिरपेक्ष आहे. हे इतक्या अट्टाहासाने सांगण्याची गरज काय? याचे कारण असे की ब्रिटिशपूर्व कालात आपल्या देशामध्ये धर्म ही सामाजिक जीवनाची एक नियामक शक्ती होती. येथील सामाजिक जीवनावर धर्माचे अधिराज्य होते. माणसामाणसांतील, गटागटातील संबंध धर्माने निश्चित झाले होते. उदाहरणार्थ पतीची सेवा करणे हा पत्नीचा किंवा धन्याशी इमान राखणे हा चाकराचा धर्म मानला जात होता. विज्ञानोत्तर काळात शिक्षण, राजनीती, अर्थव्यवहार यां सारखी सामाजिक जीवनाची विविध अंगे धर्माच्या कक्षेतून हळु हळु बाहेर पडली. कोणताही धर्म घ्या, तो हिंदू असो किंवा इस्लाम असो, ख्रिस्ती असो की यहुदी असो, त्याची स्थूलमानाने चार अंगे असतात. प्रत्येक धर्माचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान असते. सृष्टी, परमेश्वर आणि मानव या तिघांचे परस्परसंबंध याचा विचार तत्त्वज्ञानामध्ये केला जातो. धर्माचे दुसरे अंग म्हणजे आचार. प्रत्येक धर्मातील लोकांचा एकमेकांशी संबंध येतो. हे संबंध नियमित करणारे शास्त्र म्हणजे धर्मशास्त्र मनु–याज्ञवल्क्यांच्या स्मृती म्हणजे हिंदु धर्मशास्त्र. हाच परंपरागत हिंदू कायदा होय. मात्र केवळ कायद्याने मानवी मनाचे समाधान होत नाही. कायद्याच्या मागे विशिष्ट मूल्यभाव, एक सर्वंकष नीतिविवेकही असतो. धर्माचे तिसरे अंग म्हणजे कर्मकांड. प्रत्येक धर्माने परमेश्वर–प्राप्तीचे काही मार्ग सांगितले आहेत. गृहस्थ आणि संन्यासी असा फरक करून प्रत्येकाला वेगळा आचारधर्म घालून दिलेला आहे. प्रत्येक धर्माची विशिष्ट अशी एक उपासनापद्धती आहे. विज्ञानाच्या युगात वरीलपैकी पुष्कळ गोष्टी शास्त्राच्या कक्षेत आल्या आहेत. उदा. पृथ्वी, चंद्र, ग्रहगोल, अणुपरमाणू यांचे ज्ञान हवे असेल तर बायबल अथवा उपनिषदे वाचून भागणार नाही. त्या त्या शास्त्राचाच स्वतंत्रपणे अभ्यास करावा लागेल. त्याचप्रमाणे सामाजिक संबधांनाही आता धर्माचे अधिष्ठान राहिलेले नाही. मालक व मजूर यांच्यामधील तंटा सोडविताना जे समाजवादाचे ध्येय आपण स्वीकारले आहे त्याला अनुसरूनच निर्णय घ्यावे लागतील. जुन्या काळात आपल्या देशातील निरनिराळ्या जातींमधील संबंध उच्चनीचभावावर आधारलेले होते. आता ते समतेवर आधारले गेले पाहिजेत. धर्मभावना ही समतेच्या आड येता कामा नये. म्हणजेच धर्माची कक्षा यापुढे ईश्वरोपासनेपुरतीच मर्यादित राहिली पाहिजे. जोपर्यंत मृत्यूनंतरच्या स्थितीबद्दल माणसाच्या मनात भय किंवा कुतूहल राहणारच. हे कुतूहल नाहीसे करण्याची कोणत्याही शास्त्रामध्ये ताकद नाही. मरणाबद्दलची ही चिंता, ही भीती माणसाच्या मनांत जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत मनःशांतीसाठी तो कोणतातरी एक उपासनामार्ग

स्वीकारणारच. तो स्वीकारण्याचे त्याला स्वातंत्र्य असले पाहिजे. सेक्युलॅरिझमचा अर्थ असा नाही की प्रत्येकाने नास्तिकच बनले पाहिजे. जो उपासनामार्ग प्रत्येकाला योग्य वाटेल तो त्याने पत्करावा. मात्र सामाजिक संबंधांतील धर्मसंस्थेचा प्रभाव शक्य तितक्या लवकर नाहीसा झाला पाहिजे. सामाजिक संबंधांचा विचार करण्यासाठी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र अशी निरनिराळी शास्त्रे आज उदयास आली आहेत. त्यांनी स्थापित केलेल्या सिद्धातांच्या आधारेच आपण आजचे सामाजिक प्रश्न सोडविणार आहोत. त्यासाठी मनुस्मृतीचा, शरीयतचा अथवा बायबलचा काही उपयोग नाही.

भारतातील प्रत्येक धर्माला स्वतःची विशिष्ट अशा परंपरा आहे. आपले समग्र पारंपारिक जीवन धर्मावर अधिष्ठित आहे. आपण नव्या युगात आलो, नवे शिक्षण घेतले. म्हणजे आपला सर्व जीवनक्रम नव्या युगाशी सुसंगत झाला असे होत नाही. जुन्या परंपरेचे संस्कार आपल्यावर कायमच राहतात. प्रत्येक धर्माच्या बाबतीत ही पूर्वपरंपरा वेगवेगळी आहे; पण आधुनिक युगात सर्वांच्या आकांक्षा मात्र सारख्या आहेत. उच्च प्रतीचे राहणीमान, अद्ययावत शिक्षण यांची सर्वांनाच ओढ आहे. त्यामुळे सामाजिक जीवनात ताण निर्माण होतात. जातीय समस्या उत्पन्न होतात. जातिवाद हा आजच्या काळात निर्माण झालेला एक बिकट प्रश्न आहे. हा जातीवाद ऐहिकनिष्ठेच्या मूल्यांशी विसंगत आहे. भारतात मुसलमान, ख्रिस्ती, पारशी अशा वेगवेगळ्या धर्माचे लोक आहेत. म्हणूनच केवळ आपण सेक्युलॅरिझमला मान्यता दिली असे नव्हे. भारतात फक्त हिंदु धर्मांचेच लोक असते, तरी या ऐहिकनिष्ठ जीवनदृष्टीची आपणास गरज भासली असती, कारण ब्राह्मणेतर, स्पृश्य–अस्पृश्य आदिवासी आणि नागर या गटांमध्ये जे संघर्ष निर्माण होतात, ते ही या आधुनीक मूल्यांचा स्वीकार केल्याखेरीज सुटणार नाहीत. पूर्वीच्याकाळी जातीजातीत तंटे होत नसतील असे नाही. पण पूर्वीची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यांत जमीन अस्मानाचे अंतर आहे. ब्रिटिशपूर्वकाळात भारतात एक राष्ट्रीयत्वाची जाणीव नव्हती. मराठेशाहीत मराठी भाषेचा व महाराष्ट्रीयत्वाचा अभिमान थोडाफार जागृत होऊ लागला होता हे खरे. तरीही सबंध भारतातील आणि महाराष्ट्रातीलही लोकांच्या जीवनाचे मुख्य अधिष्ठान गाव किंवा जात हेच होते. शहरांची संख्या फार थोडी होती. राजकारण शहरापुरते मर्यादीत होते. म्हणूनच अनेक साम्राज्याचे उदयांस्त होऊनही इंग्रज येईपर्यंत गावगाडा आणि जातिव्यवस्था या संस्था अबाधित राहिल्या. मध्ययुगात आपला देश म्हणजे अनेक गावांचां एक समुच्चय होता. समाजालाही जातीच्या समुच्ययाचे स्वरुप होते. आपली सगळी अस्मिता गाव व जात यांच्याशी निगडित होती. अजूनसुद्धा तुम्ही खेड्यात गेलात व तेथील माणसाला तु कोण असे विचारलेत तर तो सांगेल की मी वारली आहे, ठाकूर आहे, लोहार आहे, चांभार आहे. भारतीय आहे, महाराष्ट्रीय आहे, हिंदू आहे असे म्हणण्या ऐवजी पहिल्याप्रथम तो जातीची ओळख देतो. शहरातील सुशिक्षित माणसांमध्ये आपला गाववाला भेटल्यावर प्रेमाचा जो उमाळा येतो, तो या संस्काराचाच अवशेष आहे इंग्रजांच्या आगमनापूर्वी भारतात अनेक ल्हानमोठी राज्ये नांदत होती.

त्यांनी एकत्र येऊन कधीही परकीय आक्रमणाचा प्रतिकार केला नाही. परकीयांनी एक राज्य खालसा केले, तरी दुसरे राज्य निर्धास्त असे. इतकेच नव्हे तर आपल्या शेजाऱ्याला नामोहरम करताना ते परकीयाना कधीकधी मदत करी. आज जिला आपण राष्ट्रीय एकात्मता म्हणतो ती कल्पना त्याकाळी अस्तित्वात नव्हती. पाश्चात्य विद्येचे संस्कार आणि इंग्रजांचे एकछत्री साम्राज्य यांमधून भारतात एकराष्ट्रीयत्वाचा प्रादुर्भाव झाला. जुन्या काळी खेड्यातील लोकाना राजकारणात फारसा रस नव्हता. शेतसारा दिला की त्यांचे काम संपले. आपला राजा हिंदू आहे की मुसलमान आहे याची ते फिकीर करीत नसत. खेड्यापाड्यांतील सर्व थरांमध्ये राजकारणाबद्दल आज जी आस्था दिसून येते ती इंग्रजांच्या अमदानीत निर्माण झालेली आहे. त्याच्या पूर्वी गावकी स्वयंपूर्ण असे. संकुचित गावगाड्यातच लोकांचे सारे जीवन सामावलेले असे. खेड्यातील अर्थव्यवस्था जातीवर आधारलेली होती. खेड्यात पारशी होते, मुसलमानही होते. पण हिंदू धर्मातील इतर जातीप्रमाणे एक वेगळी जात म्हणून ते लोकात वावरत. गावकीचा सर्व व्यवहार रुढीने बंदिस्त होता. जातीजातीत तंटा उत्पन्न झाला की, पंचाचा निर्णय होई. तो सर्वांना मान्य करावा लागे. स्थितीशील समाजजीवनात या तंट्यामधून गावाचे जीवन उध्वस्त होत नसे. आता प्रत्येकाच्या मनात समृद्ध जीवनाच्या आकांक्षा निर्माण झाल्या आहेत. देशाच्या वाढत्या संपत्तीत आपल्याला आपला न्याय्य वाटा मिळाला पाहिजे असे प्रत्येक गटाला वाटू लागले आहे. ज्याला वाढत्या आकांक्षाची क्रांती ( Revolution of rising expectaions ) असे म्हणतात ती स्वागतार्ह घटना आहे, पण तिच्यामधूनच सामाजिक जीवनात नवे ताण निर्माण होत आहेत. मध्ययुगातील अगदी धामधुमीचा काळ सोडला, तर खेड्यापाड्यामध्ये हिंदू आणि मुसलमान गुण्यागोविंदाने राहात होते. पूर्वीच्या काळी हिंदुमुसलमान सर्रहा एकमेकांच्या कत्तली करीत असत. असे चित्र पुष्कळदा रंगविले जाते पण ते बरोबर नाही. कत्तली फार थोड्या लोकांच्या होत आणि त्यातही नेहमी हिंदु मुसलमान असेच तंटे होत असे नाही. मुसलमानी राजवटीत परदेशी आणि दक्षिणी असे राज्यकर्त्यातच दोन तट होते. त्यांच्या झगड्यातही ते एकमेकांच्या कत्तली करीत. हिंदु राजे हिंदूंच्या आणि मुसलमान राजे मुसलमानांच्याही कत्तली करीत. त्या काळातील सत्तासंघर्षात. नेहमीच कत्तली होत. दिल्लीच्या तक्तासाठीसुद्धा अनेक मुसलमानांचे शिरच्छेद झालेले आहेत. मध्ययुगीन राजकारणच पाशवी बळावर पोसलेले होते. त्यात हिंदु-मुस्लीम कलह अजिबात नव्हता असे मला म्हणावयाचे नाही. पण तो किती होता आणि त्यात मध्ययुगीन विचारसरणीचा भाग किती होता हे आपण समजुन घेतले पाहिजे. जुन्या काळी हिंदू मुसलमानांचे तंटे असले, तरी त्यात आजच्या इतकी कटुता नव्हती. याचे कारण असे की खेड्यांत मुसलमानांची दोनचारच घरे असावयाची. त्याना हे माहीत असे की दिल्लीत जरी मुसलमान राजा असला, तरी मला त्याचा उपयोग होणार नाही. माझ्यावर काही आपत्ती ओढवली तर माझा हिंदू शेजारीच धावून येईल आणि तसा तो धावून येतही असे. लीगचे राजकारण सुरू होण्यापूर्वीची परिस्थिती मला आठवते. माझ्या एक आजी होत्या. त्यांचे इतके कडक सोवळे होते की घरात नातवंडानी शिवलेले ही त्यांना चालत नसे. पण एकादी मुसलमान

बाई बाळंतपणात अडलीं, तर त्या त्यांच्या हाकेला धावुन जात. त्यावेळी त्या जातीचा विचार करीत नसत. घरीं येऊन तेव्हा अंघोळ करीत. म्हणजे त्यांचे सोवळे माणुसकीच्या, गावातील सहकार्याच्या आड येत नसे. गावातले जीवन सर्वांच्याच सहकार्याने चाले. तेव्हा त्याकाळचे प्रश्न आणि आजचे प्रश्न यांची आपण गल्लत करु नये. इतिहास हा इतिहास म्हणूनच वाचला पाहिजे. इतिहासातील भांडणे आपण आज आपल्या जीवनात आणू नयेत. आजचे प्रश्न आजच्या पुरोगामी शक्तीचा विचार करुनच सोडविलं पाहिजेत.

राष्ट्रीयत्वाची भावना आधुनिक काळात नव्याने निर्माण झाली असे आपण म्हणतो. ही कशी निर्माण झाली ? पूर्वीच्या काळी भारतात अनेक राज्ये होती. इंग्रजांनी भारताच्या बऱ्याचशा भागावर प्रथम आपली सत्ता स्थापित केली. त्यांनी दळणवळणाची साधने मोठ्याप्रमाणावर अस्तित्वात आणली. सर्वत्र एक नाणेपद्धती सुरु केली. व्यापारावरील अंतर्गत निर्बंध दूर केले. तेव्हा समान शासनपध्दती, समान गाऱ्हाणी आणि समान गरजा यांमधून आपण सर्व एका राष्ट्राचे नागरिक आहोत ही कल्पना १८७० च्या सुमारास उदयास आली. तिच्यांमधुनच पुढे १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. काँग्रेसची स्थापना हिंदूनी केली असा पुष्कळांचा समज आहे. पण ती निघाली युरोपियांच्या प्रेरणेने. ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम आणि सर विल्यम वेडरबर्न हे तिचे संस्थापक. तिचे पहिल्या वर्षीचे अध्यक्ष उमेशचंद्र बॅनर्जी हे ख्रिस्ती. दुसऱ्या वर्षीचे दादाभाई नौरोजी हे पारशी, तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष बद्रुद्दीन तय्यबजी हे मुसलमान होते. राष्ट्रसभेच्या कामात भाग घेणारे लोक संख्येने फार थोडे होते. बहुसंख्य समाज त्याकाळी आपल्या संकुचित अस्मितेतच अडकलेला होता. पण इंग्रजी शिक्षणामधून राष्ट्रवादाची नवी भावना निर्माण झाली. या भावनेमधुन निरनिराळ्या धर्मांचे व जातीचे सुशिक्षित लोक एकत्र आले. आपल्या देशाची प्रगती व्हावयाची असेल तर आपले संकुचित हितसंबंध बाजूस सारले पाहिजेत. हे त्यानी मान्य केले. जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्वाची कल्पना आपण १९८५ पासून स्वीकारलेली आहे. आता हे राष्ट्रीयत्व ध्येयवादाच्या दृष्टीने तत्वत: धर्मनिरपेक्ष होते हे खरे आहे. पण प्रत्यक्ष व्यवहार काय घडला याचाही विचार केला पाहिजे. तत्व आणि व्यवहार यांच्या मिलाफातून समाजाची घडण बनत असते. राष्ट्रीय चळवळीला सुरवात सुमारे शंभर वर्षापूर्वी झाली या शंभर वर्षात जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्वाची कल्पना आपल्यामध्ये किती प्रमाणात रुजली आहे याचा आपण प्रांजलपणे विचार केला पाहिजे.

राष्ट्रीयत्वाची कल्पना येथे प्रथम पाश्चात्य विद्येच्या संस्कारांमधुन आली. हा पाश्चात्य विचार म्हणजेच आधुनिक विचार. आधुनिक राजकिय व औद्योगिक क्रांती प्रथम इंग्लंडमध्ये झाली. म्हणून नव्या विचारांचा उगमही तेथेच झाला. इंग्रजी भाषेच्या द्वारे या आधुनिक विचारांचे लोण आपल्यापर्यंत येऊन पोहोचले. इंग्रजी विद्या हे वाघीणीचे दुध आहे असे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी म्हटले आहे. याचा अर्थ इंग्रजी भाषेला महत्व आहे असा नाही. इंग्रजी भाषेत जे विचारप्रवर्तक साहित्य आहे, जो स्फुर्तिदायक इतिहास आहे, इंग्रज लोकांमध्ये स्वातंत्र्याची जी दुर्दम्य अशी लालसा आहे.

त्यामुळे हे वाङ्मय वाचणाऱ्या माणसाच्या मनात स्वातंत्र्यप्रीती व देशाभिमान संचरेल असे चिपळूणकरांचे म्हणणे होते. इंग्रजांशी संबंध आल्यावर भारताच्या आधुनिकीकरणाला प्रारंभ झाला. या स्थित्यंतराला दोन गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत झाल्या. एक म्हणजे ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा धर्मप्रसार व दुसरे इंग्रजी शाळातून मिळणारे विज्ञानाचे शिक्षण. यांपैकी आपल्या नवशिक्षितांवर विज्ञानापेक्षा ख्रिस्ती धर्माचाच प्रभाव अधिक पडला. राम मोहन रॉय पासून गांधी विनोबापर्यंत आपले सर्व लोकप्रिय राष्ट्रीय नेते अत्यंत धार्मिक वृत्तीचे आहेत. आगरकरांसारखा एकादा अपवाद आढळतो. पण आगरकर अज्ञेयवादी असल्याने फारसे लोकप्रिय झाले नाहीत. बरे, उच्चवर्णीयांचेच नेते धार्मिक होते, असेही नाही. महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा पिंडही धार्मिकच आहे. हे नेते जर धार्मिक नसते, तर कदाचित त्याना येथील जनतेच्या मताची पकड घेता आली नसती हेही खरं आहे. पण आपल्याला आता नवे काही घडवावयाचे आहे; म्हणून इतिहासात जे काही घडले तही आपण नीट समजून घेतल पाहिजे. महात्मा गांधी व लोकमान्य टिळक व्यक्तिशः फार मोठे होते. यांच्या नखाची सरही आपल्याला येणार नाही. त्यांच्या पुण्याईवरच आपले वैचारिक जीवन उभे आहे. पण आपल्याला पुढे जायचे असेल, तर या नेत्यांच्या मर्यादाही आपण समजून घेतल्या पाहिजेत. वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून इतिहासाचे विश्लेशण केले पाहिजे. केवळ अंधश्रद्धेला सांप्रदायिक अभिनिवेशाला आपण बळी पडलो तर इतिहासापासून आपण काहीच बोध घेऊ शकणार नाही. एकोणिसाव्या शतकात ख्रिस्ती धर्माचा येथील सुशिक्षितांवर खूपच परिणाम झाला ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या प्रचाराला आपले लोक बळी पडू नयेत अशी इच्छा असेल.तर आपल्या धर्मात सुधारणा घडवून आणण्याखेरीज गत्यंतर नाही याबद्दल येथील सुशिक्षितांची खात्री पटली. त्यामधून ब्राह्मोसमाज, आर्यसमाज. प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, अशा अनेक मंडळ्या स्थापन झाल्या. विवेकानंदानी अमेरिकेत हिंदू धर्मांची ध्वजा फडकावून संघटितरित्या कार्य करण्यास जेव्हा सुरवात केली, तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर ख्रिस्ती मिशनचा आदर्श होता. गोखले यांनी हिंद सेवक समाज ( Servant of India Society ) या संस्थेच्या कार्यकर्त्यांत मिशनऱ्याची निष्ठा व तन्मयता असली पाहिजे अशी अपेक्षा बाळगली होती. ख्रिस्ती धर्मोपदेशक धर्मप्रसाराच्या हेतूने प्रथम खेड्यापाड्यात गेले गोरगरिबांची, अनाथ अपंगांची त्यानी सेवा केली. हिंदू धर्मातील उच्चवर्णीयच खालच्या थरांतील लोकांचा विटाळ मानीत असत. या गोऱ्या मिशनऱ्यांनी त्यांना जवळ केले. राज्यकर्त्यांचे धर्मबंधू, पौर्वात्य व पाश्चात्य अशा दोन्ही विद्यांमध्यें पारंगत असणारे डॉ. विल्सन सारखे लोक खेड्यांत जाऊन दलितांची आपुलकीने विचारपूस करू लागले. खेड्यांतील लोकांची मने त्यांनी आपल्या सेवाभावाने जिंकून घेतली. त्यांच्या कार्यकर्त्यातील नैतिकतेचा आपल्याकडील सुशिक्षितांवर फार मोठा प्रभाव पडला. आणि त्यांना समाजसेवेची प्रेरणा मिळाली. विज्ञाननिष्ठा मात्र आजतागायत आपण आत्मसात करू शकलो नाही. लोकशाहीत धर्मश्रद्धा ही व्यक्तीच्या खाजगी जीवनापुरती मर्यादित राहिली पाहिजे, सामाजिक व्यवहारात धर्माची लुडबुड असता कामा नये, पण ही बुद्धिनिष्ठा, ही धर्मनिरपेक्षता इथे रुजली नाही. पारतंत्र्याच्या काळात आपल्या राष्ट्रापुढे एक मोठा पेच होता. एका बाजूला इंग्रजांशी लढायचे होते. दुसरीकडे आपल्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या समाजव्यवस्थेतील नवी नवी मूल्ये आपल्याला आत्मसात

करायची होती. एकीकडे त्याला विरोध करायचा व दुसरीकडे त्यांचे अनुकरण करायचे असा तो भावनात्मक पेच होता. सुधारकांचा भर इंग्रजांच्या अनुकरणावर होता. त्यामुळे राज्यकर्त्यांना हिरीरीने विरोध करणे त्यांना जमले नाही. साहाजिकच त्यांच्या ठिकाणी राष्ट्राभिमान नाही अशी त्यांची हेटाळणी करण्यात आली. उलट इंग्रजाशी लढणे हेच ज्यांचे उद्दिष्ट होते, ते लोकांमध्ये प्रतिकारक्षमता आणण्यासाठी धडपडत होते. इंग्रजांच्या अनुकरणावर भर दिल्यास लोकांच्या स्वाभिमानाला धक्का बसेल अशी त्यांना भीती वाटत होती. म्हणुन आपला इतिहास, संस्कृती, धर्म, भाषा यांचे गोडवे गायला त्यांनी सुरवात केली. त्यातून पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती निर्माण झाली. आपल्या संबंध राष्ट्रवादी परंपरेमध्ये उदारमतवादाचा पराभव झालेला आहे. इथे रानडे आगरकर यांचा पराभव झालाच, पण फुले, आंबेडकर यांचाही पराभव झाला. महात्मा गांधीना जरी वैयक्तिक लोकप्रियता लाभली, तरी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पराभव झाला आहे. साधनशुचितेचा आग्रह धरणारा आणि विश्वशांतीसाठी आत्मार्पण करणारा हा माणूस जाऊन तीस वर्षे झाली नाहीत तोच सगळीकडे एवढा भ्रष्टाचार माजला आहे. कोतेपणा तरी किती ! बारीक बारीक गट, जातीचे गट, गावाचे गट, प्रांताचे गट. फक्त परकीयांचे आक्रमण होते, तेव्हा या गटबाजीला थोडा आळा बसतो. चीनचे आक्रमण झाले, तेव्हा काही काळ सर्व एक झाले. पाकशी दोन युद्धे झाली त्यावेळीही एकजूट दिसून आली. राष्ट्रीयत्वाची उर्मी देशभर उसळली. पक्षभेद क्षण-भर बाजूला सारले गेले, पण किती वेळ ? जिवाला धोका होता देशाच्या जीवनमरणाचा प्रश्न होता तोपर्यंत. नवनिर्माणासाठी आम्ही एक दिलाने धडपडतो आहोत असे कुठे आढळत नाही. शांततेचा काळ आला, जरा उसंत मिळाली की झाली भांडणाला सुरवात. नुसते पक्षभेद नाहीत, नुसते वर्णभेद नाहीत, प्रांताप्रांतामध्ये एकमेकांचे शत्रु असल्यासारखी भांडणे होतात. जातीजातीत धर्माधर्मात भांडणे होतात. मग यांतून राष्ट्र कसे उभे राहणार ? यात कोणाला दोष देण्याचा उद्देश नाही. मात्र असे का होते हे आपण समजून घेतले पाहिजे. इतिहासाची पुनरावृत्ती टाळली पाहिजे. नाहीतर तेल्याच्या घाण्याभोवती बैल जसा फिरत राहतो, तसेच आपण चक्राकार फिरत राहू. आपल्या राष्ट्रवादी चळवळीत हिंदू राष्ट्रवाद, मुस्लीम राष्ट्रवाद, बौद्धांचा राष्ट्रवाद असे निरनिराळे प्रवाह निर्माण झाले. यात दोष कुणाचा किती याचा खल करण्यात हशील नाही. पण ही स्थिती बदलली पाहिजे. या सर्व चळवळी सत्ता संघर्षाच्या संदर्भात उत्पन्न झाल्या. १९०६ साली म्हणजे मोर्ले-मिंटो सुधारणांना आकार येत असताना मुस्लीम लीगची स्थापना झाली. या सुधारणा कायद्याने मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले. मला आठवते की इंग्रजांच्या भेदनीतीचा हा पहिला तडाखा आमच्या लहानशा जव्हार संस्थानात बसला. त्यावेळी सरकारने एक उर्दू शाळा काढलेली होती. पण एकही मुलगा न आल्या मुळे ती बंद करावी लागली. गावात मुसलमानांची पन्नाससाठ घरे होती. त्यांची मुले मराठी शिकत. आमच्या शाळेत दोन तीन मुसलमान शिक्षक होते. ते आमच्यासारखे धोतर नेसायचे उत्तम मराठी बोलायचे, ते सणाला आमच्या घरी यायचे, आपले लोक त्यांच्याकडे

जायचे. द्विराष्ट्रवादाला धार येईपर्यंत हिंदु-मुसलमानांचा तंटा तेथे उपस्थित झाला नव्हता. पण आतामात्र पिढानपिढ्या सलोख्याने एकत्र नांदलेल्या लोकांत एकदम दुजाभाव निर्माण झाला आहे. १९१९ साली मॉटेंग्यू चेम्सफर्ड सुधारणा आल्या तेव्हा ब्राह्मण – ब्राह्मणेत्तर वादाला सुरवात झाली. गोलमेजपरिषदेनंतर अस्पृश्यांच्या चळवळीला उठाव मिळाला आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास आदिवासी चळवळीचा उदय झाला. समाजाच्या निरनिराळ्या थरात जसजशी जागृती झाली, तसतशी राजकीय सत्तेत व संपत्तीत भागीदारी मिळ-वण्याची आकांक्षा त्यांच्यामध्ये उत्पन्न झाली. यात वास्तविक कांही वाईट नाही. स्वराज्य मिळवले, ते लोकांना नैसर्गिक हक्क मिळावे, त्यांचे जीवनमान सुधारावे म्हणूनच. मध्ययुगात देशातील बहुसंख्य लोक राजकीय सत्तेबद्दल उदासीन होते. 'ठेविलें अनंतें तैसेचि राहावे' अशा प्रकारच्या दैववादाच्या आहारी जाऊन पशुतुल्य जीवन ते जगत होते. आता लोक तसेच अल्पसंतुष्ट राहतील हे शक्य नाही. आपल्या देशात लोकशाही आहे, प्रौढ मताधिकार आहे. समाजवादी समाजरचनेच्या घोषणा आपण केलेल्या आहेत, त्यांमधून लोकांना आपल्या हक्कांची जाणीव झाली तर ते स्वाभाविकच नाही का ? राष्ट्रीय नेत्यानी लोकांना दिलेली आश्वासने आणि त्यांची पूर्तता यांच्या तफावतीतून आजचे तणाव निर्माण झाले आहेत. यांतून मार्ग काढावयाचा तर ध्येयनिष्ठा व व्यापकदृष्टी यांची आवश्यकता आहे.

आगरकर आणि फुले यांच्यासारख्या बुद्धिवादी विचारवंतांच्या या महाराष्ट्रामध्ये आज पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती डोकावत आहे. खऱ्या अध्यात्मवादाला माझा विरोध नाही. गांधी किंवा विनोबा यांचे अध्यात्म ही एक जीवन उजळून टाकणारी प्रेरणा आहे. पण सारसबागे-मध्ये दर्शनासाठी लांबच्या लांब रांग लागते आणि सुशिक्षितांमध्ये नवससायास करण्याची प्रवृत्ती फैलावते ही आध्यात्मिक प्रेरणा नव्हे. तो निव्वळ धर्मभोळेपणा आहे. मुलगा आजारी पडला की एकाद्या उत्कृष्ट डॉक्टरचा सल्ला ध्यायचा आणि वर एखाद्या बुवाचा अंगाराही लावायचा. डॉक्टर फेल झाला तर ! ही मनांत शंका. त्यासाठी दैवी उपायांची तरतूद म्हणजेच बुडत्याला काडीचा आधार. हा भोळेपणा अडाणी लोकांत आहे असे नाही. विलायतेतून उच्च विद्या शिकून आलेले लोकही त्याच्या आहारी जातात. कारण आपण विज्ञानाचा वापर करीत असलो, तरी खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठा आपण पत्करलेली नाही.

भारतात सत्तासंघर्षाच्या राजकारणातून जातिवादाची उत्पत्ती झाली हे आपण पाहिले. यामागे तिसरीही एक शक्ति होती. हिंदू मुसलमान हे दोनच समाज भारतात असते, तर लढून लढून का होईना, पण कुठे तरी त्यांचा आपसात समझोता झाला असता. मुसलमानी आमदानीत येथे अनेक राज्ये होती. बहामनी राजाच्या पदरी अनेक मोठेमोठे हिंदू सरदार होते. विजयनगरच्या हिंदू राजाच्या वतीने अनेक मुसलमान सैनिक निष्ठेने लढले. त्यांना कुर्निसात करायला संकोच वाटू नये म्हणून त्या राज्यात सिंहासनासमोर कुराणाची प्रत ठेवलेली असे, याचा अर्थ आजच्या कांही मुसलमानांमध्ये पाकिस्ताननिष्ठा असणारच नाही असा नव्हे. अशी राष्ट्रद्रोही वृत्ती जेथे दिसेल तेथे सरकारने कडक धोरण स्वीकारले पाहिजे हे निर्विवाद. पण पाचपन्नास माथेफिरू लोकांसाठी सगळ्या समाजाला राष्ट्रद्रोही समाजणे योग्य नाही. धर्मांचा व राष्ट्रनिष्ठेचा काही संबंध नाहीं,

आधुनिक काळात धर्म हा राष्ट्राचे अधिष्ठान होऊ शकत नाही असे गांधी व नेहरू म्हणत असत. आपल्यांपैकी पुष्कळांना त्याकाळी ते पटले नाही. पण पाकिस्तानने आपल्याला दाखवून दिले आहे की एकाच धर्माचे लोकही एकमेकांवर अनान्वित अत्याचार करू शकतात. मुसलमानानीच बंगला देशात मुसलमानांवर जुलूम केला. म्हणून पाकिस्तानची दोन शकले झाली. आज टागोरांची एक कविता बंगला देशाचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारलेली आहे. बंगाली भाषा तेथे राष्ट्रभाषा झालेली आहे तेव्हा मुसलमान हे कधीही आपल्या राष्ट्राशी एकरूप होणार नाहीत असे म्हणण्यात काही अर्थ नाही. कोणत्याही समाजात देशाला विघातक अशा ज्या काही प्रवृत्ती असतील, मग त्या हिंदूत असोत की मुसलमानांत त्या ठेचून काढाव्याच लागतील. पण इतिहासातील पूर्वग्रह उगाळीत बसून आपण आजचे प्रश्न बिकट करू नयेत. आजचा जातिवाद हा इंग्रजांच्या भेदनीतीचा परिपाक आहे. स्वतंत्र मतदारसंघ देऊन त्यांनी मुसलमानांना हिंदूहून वेगळे काढले. त्याच हेतूने १९१९ साली त्यानी मराठ्यांना राखीव जागा दिल्या. पुढे १९३२ झाली अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ देऊन हिंदूमध्ये फूट पाडण्याचा त्यांचा डाव होता. पण गांधीजीनी प्राणांतिक उपोषणाचा मार्ग अवलंबून ते संकट टाळले.

भारतीय समाजाची अस्मिता आतापावेतो धर्माशी निगडित होती ह आपण पाहिले. गांधी धार्मिक वृत्तीचे असले, तरी त्यांची धर्मकल्पना उदात्त व व्यापक होती. मानवी मनातील नैतिक प्रेरणेला त्याचे आवाहन होते. पण त्यांच्या धर्मकल्पनांचा लोकांनी वेगळाच अर्थ लावला. येथील सामान्य लोकांचा धर्म ईश्वराशी निगडित नसून मशीद व देवळे यांच्याशी निगडित होता. ही धर्माची मूर्त स्वरूपे आमचे मानबिंदू मानली गेली. त्यामधून भांडणांना ऊत आला. गांधीजी सांगत होते की स्वातंत्र्यसंग्रामामध्ये नुसत्या लढाऊ कार्यक्रमाने भागणार नाही. खेड्यापाड्यांत जाऊन तुम्हाला नव्या जाणिवा निर्माण कराव्या लागतील. पण या रचनात्मक कार्याकडे कुणीही लक्ष दिले नाही. राजकीय कार्यकर्त्यांपैकी पुष्कळांचे लक्ष संसदीय राजकारणावर केंद्रित झाले होते. विधायक कार्याची त्यांनी कुचेष्टाच केली. गांधीजींचा शब्द प्रमाण मानून जे वेडेपीर खेड्यांत जाऊन बसले, त्यांनी मध्ययुगीन कल्पनाकोशातून पूर्णपणे बाहेर पडता आले नाही. समाजवाद्यांपाशी आधुनिक शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान होते. पण आपल्या पूर्वपरंपरेतील पीळ व पेच त्यांना बरोबर उमगले नाहीत. आर्थिक क्रांती झाली की सर्व प्रश्न आपोआप सुटतील अशी त्यांनी स्वतःची समजूत करून घेतली. कामगारांच्या मनावर नव्या मूल्यांचे संस्कार घडवून आणण्यासाठी त्यांनी पुरेशी धडपड केली नाही. म्हणून कामगार संघटनाच्या मार्फत समाजवादी विचारांचा खेड्यापाड्यांत प्रसार होण्या-ऐवजी जातीयवादाचाच कामगार संघटनावर प्रभाव पडला. स्वातंत्र्यानंतर तर सारे पक्ष केवळ सत्तेच्या राजकारणात गुंतून पडले. सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठही उरले नाही. कामगारसंघटना केवळ दैनंदिन आर्थिक प्रश्न धसाला लावतात. पण त्यांच्या कार्यामधून क्रांतीची पूर्वतयारी होत नाही. पुढाऱ्यांना वाटते आपण लोकांना आपल्या उद्दिष्टासाठीं राबवू. पण लोकही काही कमी चलाख नसतात. संपकाळात ते समाजवादी पुढाऱ्यांचे नेतृत्व मान्य करतात. पण निवडणुकांत त्यांना मते देत नाहीत. गांधींनी स्वातंत्र्याची एवढी चळवळ केली.

पण शेवटच्या काळात ते एकाकीच राहिले. काँग्रेसने स्वातंत्र्यसंग्रामात त्यांचे नेतृत्व पत्करले. पण त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन तिने कधीच मान्य केला नाही. आंदोलनाच्या काळात लोकांच्या उत्साहाला उधाण यावयाचे. पण ती लाट ओसरली की समाज आपल्या नेहमीच्या संथ गतीनेच वाटचाल करीत राही.

भारतातील लोकांना आपला हिंदू धर्म व आध्यात्मिक परंपरा यांचा फार मोठा अभिमान आहे. पण आत्मपरीक्षण आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण यांचा आपल्याकडे अभावच आहे. युरोपातील विचारवंतांनी ख्रिस्ती धर्माचा बारकाईने अभ्यास करून आधुनिक विज्ञानाशी त्याची सांगड घालण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. आपणही आता विज्ञानाच्या युगात आहोत. आगगाडी, मोटार, मायक्रोफोन, विजेचे दिवे या वाचून आपले चालत नाही. मात्र आपल्या आध्यात्मिक श्रेष्ठतेचा अजूनही आपल्याला खोटा अहंकार आहे. आध्यात्मिक परंपरेचे गोडवे गात असताना धान्यासाठी परदेशावर अवलंबून राहण्याची आपणास शरम वाटत नाही. मिथ्याभिमानाची ही जुनी परंपरा बुद्धिवादाच्या भट्टीत घालून शुद्ध करण्याची वेळ आता आलेली आहे. नवा सामर्थ्यवान एक संघ समाज निर्माण करावयाचा असेल तर परंपरेतील जीर्ण, हिणकस भाग टाकून देण्यावाचून गत्यंतर नाही.

आपल्या मनातील परंपराप्रियतेचा जातियवादी गटांनाच नेहमी फायदा मिळतो मुंबई नगर-पालिकेच्या निवडणुकीचे निकाल याची साक्ष देतील. ' वंदे मातरम् ' च्या प्रश्नावरुन महापालिकेत चकमक उडाली. वंदेमातरम् आग्रह धरुन आपले देशप्रेम सिद्ध करण्याची काँग्रेस व समाजवाद्यां-मध्ये अहमहमिका लागली. हे गीत न म्हणणे हा मुस्लीम लीगने तर धार्मिक प्रतिष्ठेचा प्रश्न करुन ठेवला. परिणाम काय झाला ? डाव्या पक्षांना १४० पैकी इनमिन आठ अधिक चार जागा. फायदा मात्र जातीय पक्षांचा. मुस्लीम लीगच्या जागा दोन वरून सोळा गेल्या. जनसंघाचे सहाचे पंधरा झाले. शिवसेनेचे तेवढेच राहिले. म्हणजे मध्यंतरीच्या काळात या संघटनची लोकप्रियता कमी होऊनही तिचे संख्याबळ घटले नाही. कोणत्याही प्रश्नाला हिंदू-मुस्लीम तेढीचे भावनात्मक रूप दिल्यास प्रतिगामी पक्षांचे फावणार हे उघड आहे. या अतिरेकीपणाला खतपाणी घालून आपण रक्तपात व गोळीबार यांना उत्तेजन देणार आहोत का ?

भारतीय घटनेनुसार जातिधर्मनिरपेक्ष समाज निर्माण करण्याची आपण प्रतिज्ञा केली पण स्वातंत्र्योत्तर काळात निवडणुकांच्या राजकारणात जातीय भावनेला खतपाणीच मिळाले. निवडणुकीसाठी उमेदवार उभा करताना प्रत्येक पक्ष जातीचा विचार करतो. इथे मांगांची वस्ती असेल, तर मांग उभा करा. आगऱ्यांची असेल तर आगरी कार्यकर्त्याला तिकीट द्या. सत्ताधारी पक्षही हा विचार करतो. मग विरोधी पक्ष तर दुबळेच आहेत. निवडणूक लढवायची तर तत्त्वनिष्ठेचा बडेजाव माजवणे त्यांना परवडत नाही. म्हणून तात्कालिक लाभहानीचा विचार करतात. अशा या दुष्ट चक्रात आपण सापडलो आहोत. आणि इतके करूनही डाव्या पक्षांना स्थैर्य नाही. फुटीरपणा चालूच आहे. मंत्रीमंडळे वारंवार गडगडत आहेत. केवळ विरोधी पक्षांचीच नव्हे तर काँग्रेसचीही.

एक कोट काढून दुसरा घालावा इतक्या सहजपणे नामदार पक्ष बदलतात. त्यांच्यामध्ये ना ध्येयवाद ना तत्त्वनिष्ठा. या पक्षांच्या द्वारे समाजपरिवर्तन होईल अशी अशा करायला जागा आहे कां? सत्ताधारी प्रश सामान्यत: क्रांती करीत नाहीं. कुठेही पहा तो सत्तेला चिकटूनच राहातो. आणि संधीसाधू माणसे त्याच्याभोवती गोळा होतात. पण बहुसंख्य लोक ज्या पक्षाच्या बाजूला आहेत तो पक्ष काहीच करणार नाही हेही खरे नाही. लोकमताचा दबाव आला तर स्वत:चे अस्तित्व टिकवून धरण्यासाठीं तरी त्याला दोन पावले पुढे टाकावी लागतील. पण एवढा दबाव आणण्याचे कामही विरोधी पक्ष करू शकत नाहीत. कारण प्रत्येक विरोधी पक्षाची शकले झाली आहेत. कॉंग्रेस द्र. मु. क. हेही यापासून मुक्त राहु शकले नाहीत. कम्युनिस्ट कधी न फुटणारे पण त्याचेही तीन तुकडे झाले. म्हणजे हा नुसता एका पक्षाचा रोग नाही. संबंध समाजामध्येच या फुटीरतेची साथ फैलावली आहे. सर्वसामान्य लोकाना भांडणे नको असतात. कोणताही दंगा झाला की त्यात निरपराध गरीब लोकच बाळी पडतात. सत्ताधारी वर्ग आपल्या स्वार्थासाठी लोकांच्या धर्मश्रद्धेचा वापर करतात. त्यातून प्रश्न सुटत नाहीत म्हणून लोकांच्या मनावर ऐहिकनिष्ठ बुद्धिवादी विचार–सरणीचे संस्कार घडवून आणण्याचे कार्य कुणीतरी हाती घेतले पाहिजे यादृष्टीने सर्वात परिणामकारक साधन म्हणजे शिक्षण होय. पण इंग्रजांच्या काळापासून आपल्या देशात चालत आलेल्या शिक्षणपद्धतीत स्वातंत्र्यप्राप्ती-नंतरही अद्याप कांही मूलभूत फरक झालेला नाही. तपशिलात थोडे फेरफार झाले असतील पण आपली मनोरचना, आपले संस्कार अजून जुनेच आहेत. सामाजिक समतेचा प्रश्न घ्या. सुशिक्षित माणसाच्या मनात सामाजिक विषमतेबद्दल चीड असली पाहिजे, पण तसे आज दिसून येत नाही. तंत्राविशारदांचा एक नवा वर्ग आपल्याकडे आज निर्माण होत आहे. तो समाज पराङ्मुख आहे. महिन्याला २००० रुपये पगार मिळाला म्हणजे झाले. समाज जाईनाका खड्ड्यात! अशी या लोकांची वृत्ती आहे. राजकारणाबद्दल त्यांना आस्था नाही उद्या कोणत्याही पक्षाचे राज्य आले तरी औद्योगिकरणासाठी तंत्रज्ञाची गरज भासणारच याबद्दल त्यांची खात्री आहे. त्यामुळे त्यांचे सामाजिक ऋणानुबंध सुटत जाऊन वृत्तीने ते उपरे बनत आहेत. त्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. त्याना मराठी बोलता येत नाही, याचा आईवडिलांना अभिमान वाटतो. हा वर्ग बुद्धिमंतांचा आहे. पण त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे व्यावसायिक उत्कर्षाचे एक साधन आहे; कणखर ध्येयनिष्ठा देणारी, जीवन उजळून टाकणारी प्रेरणा नव्हे. परंपरा अजिबात टाकून द्यावी असे माझे म्हणणे नाही. परंपरेचा फास आपल्या मानगुटीला बसलेलाच आहे. तो सोडू म्हटले तरी सुटणार नाही. पण परंपरेचा अतिरिक्त गौरव नको. मात्र परंपरेशी विद्रोह करूनही उपयोग नाही. वस्तुनिष्ठ व विवेचक दृष्टीने आपल्या जुन्या वाङ्मयाचा परामर्ष घेण्यास आपण शिकले पाहिजे. ज्ञानेश्वरी घ्या, तुकारामांची गाथा घ्या. त्यात जातिभेद आहे, वर्णाश्रमधर्म आहे अस्पृश्याला तुच्छ लेखले आहे. महिलांच्या दास्याला मान्यता आहे. म्हणून ते वाङ्मयच नामशेष करून कसे चालेल? ते विद्यापीठामध्ये ठेवू नका असेही लोकांचे म्हणणे आहे. ते बरोबर नाही ऐतिहासिक दृष्टीने विचार करून ज्ञानेश्वरांनी त्या काळात कोणता पुरोगामी विचार मोडला, त्याच्या मर्यादा कोणत्या याचा विचार करण्यास आपण शिकले पाहिजे. पाश्चात्य देशातील प्लेटो आणि ॲरिस्टॉटल

हे विचारवंतही त्यांच्या काळात गुलामगिरीची तरफदारी करीत होते. खालच्या वर्गातील लोकांना तुच्छ लेखीत होते. म्हणून त्यांचे तत्त्वज्ञान युरोपीय लोकांनी फेकून दिले नाही. जुने वाङमय फेकून दिले म्हणून अंतःकरणातील जुने संस्कार फेकले जात नाहीत. म्हणून जे कालबाह्य आहेत ते आपण त्याज्यच मानावे. पण त्यातील चिरंतन अशाही टिकवून धरावा. मी स्वतः आस्तिक नाही. पण मी ज्ञानेश्वरी वाचतो. ज्ञानेश्वराचे जे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे तुकारामांच्या वाणीमध्ये रंजल्या गांजल्याविषयी जो कळवळा आहे. त्याचे मला आकर्षण वाटते. मात्र १९७३ साली तुकारामांचे तत्त्वज्ञान उपयोगी पडेल असे कोणी सांगू लागले, तर ते मी मानणार नाही. गांधी नेहरूंचे तरी सर्वांच्या सर्व विचार मला कुठे पटतात. त्यांच्या काळात त्यांनी मोठी कामगिरी केली. पण आजचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे विचार पुरे पडणार नाहीत. माणूस कितीही मोठा असला, तरी तो अपूर्णच असणार. त्याच्या विचाराला व कर्तृत्वाला काळाच्या आणि परिस्थितीच्या मर्यादा पडणार हे आपण ध्यानात घेतले तर जातिसंस्थेविरुद्ध खवळून उठणाऱ्या नवबौद्ध विद्यार्थ्यांलाच ज्ञानेश्वर तुकारामाच्या वाङ्मयाचे रसग्रहण करता येईल. इतक्या व्यापक निरामय व वस्तुनिष्ठ दृष्टीने आपण इतिहासाकडे पाहू शकलो, तरच इतिहासाचा उपयोग होईल नाहीतर इतिहास शापच ठरेल.

सत्तेच्या राजकारणातून जातिवादाचे पोषण होते हे खरे आहे पण तेवढयावरून सत्ताच निषिद्ध मानणे श्रेयस्कर नाही. सत्ता हा शाप असता तर स्वराज्य मिळविण्याचा खटाटोप तरी आपण का केला असता ? मात्र सत्तास्पर्धेतही काही पथ्ये पाळली गेली पाहिजेत. ती पथ्ये आज कुठलाही पक्ष पाळताना दिसत नाही. आपण मुस्लीम लीगच्या नावे ओरडतो. पण लीगचे पुनरुज्जीवन कोणी केले ? डावे उजवे दोन्ही प्रकारचे पक्ष याला जबाबदार आहेत. काँग्रेसनेही वेळोवेळी लीगशी समझोता केला. सत्ताधारी पक्षाचे एक जाऊ द्या, पण क्रांतीचे निशाण घेऊन जे बाहेर पडले, त्यांनीही आपले साथीदार निवडताना तारतम्य बाळगले नाही. म्हणुनच संयुक्त आघाडयांचे राजकारण अपेशी ठरले. क्रांती करण्याची आपणा सर्वांची इच्छा आहे, पण तिच्यासाठी आवश्यक असलेली तपस्या सातत्याने चालू ठेवण्याची आपली तयारी नाही. युरोपमध्ये जी सामाजिक क्रांती झाली तिची तयारी तीनचारशे वर्षे चालू होती. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना झगडा करावा लागला. सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही तर पृथ्वीच सूर्याभोवती फिरत आहे असे सिद्ध केल्याबद्दल गॅलिलिओला पोपकडून विलक्षण छळ सहन करावा लागला. ब्रूनोला तर जिवंत जाळण्यात आले. हे जे विज्ञानोपासक होते हे खऱ्या अर्थाने धार्मिक होते. Discovery of India या ग्रंथात नेहरूंनी म्हटले आहे, ' आधुनिक जगात सारा जन्म प्रयोगशाळेत स्वतःला डांबून घेऊन सबंध मनुष्य जातीच्या सुखासाठी आयुष्य वेचणारे शास्त्रज्ञच खरे धर्मनिष्ठ होत, मला हे पटते. जर यंत्रयुग आले नसते तर, समतेचा विचारच आपण करु शकलो नसतो. प्रत्येक माणसाला किमान जीवनमान मिळवून देण्याची प्रतिज्ञा करणे पाचशे वर्षांपूर्वी शक्य नव्हते. विज्ञानाचीच ती किमया आहे. हे विसरून विज्ञानामुळे मानवी जीवनातील स्पर्धा संघर्ष आणि दुःखे वाढली आहेत असे आपण म्हणतो, आणि जुन्याचे गोडवे गातो. विज्ञानासाठी, समाजपरिवर्तनासाठी आपण काही किंमत दिलेली नाही. म्हणूनच त्या

निष्ठा आपल्या अंतःकरणांत रुजल्या नाहीत. भौतिक परिस्थितीही याला कारणीभूत आहे हे खरे. आजच्या युगात जीवनाला विलक्षण गती मिळालेली आहे पण त्याचबरोबर व्यक्ती अगतिक बनलेली आहे. शासन तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही. व्यक्तीचे सामर्थ्य व आत्मविश्वास वाढविणाऱ्या व्यावसायिक संघटनांचा येथे अभावच आहे. त्यामुळे पूर्वसंस्कारामुळे प्रत्येक माणूस जातीकडे धाव घेतो. जातीतील चार श्रीमंत लोक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाला मदत करतात. अनाथांना आधार देतात म्हणून कामगार संघटना, सामाजिक संस्था आणि शासकीय यंत्रणा व्यक्तीला आधार देण्यासाठी तिच्या पाठीशी उभ्या राहिल्याशिवाय जातिनिष्ठेला ओहोटी लागणार नाही. आज मुंबईमध्ये प्रत्येक जातीच्या वेग-वेगळ्या संस्था आपणास आढळून येतात. त्या आपापल्या जातीमधील गरिबांना मदत करतात. पण निरनिराळ्या जातीमधील विषमता त्यांच्या कार्यामधून कमी होत नाही. शहरांत व्याव-सायिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जेथे स्वतंत्र संघटना उभ्या आहेत. तेथे जातीयतेची धार थोडीफार कमी कमी झाली आहे असे दिसून येते. कोणत्याही जातीचा मनुष्य तेथे निवडून येऊ शकतो. खेड्यातील जातीयता मात्र अद्याप कायम आहे.

हमीद दलवाई आपल्या लोकांचा रोष पत्करूनही मुसलमानांमध्ये ऐहिकनिष्ठ विचारसरणीचा प्रचार करीत आहेत. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या धर्तीवर त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली आहे. त्यासाठी त्यांना मारही खावा लागला. मुसलमान समाजात ते नवे प्रबोधन घडवून आणित आहेत. मुसलमानांनी राष्ट्रध्वजाला मान दिला पाहिजे असे ते मुसलमान लोकांना सांगत आहेत, मुसलमान समाजातून ऐहिकनिष्ठ राष्ट्रवादी दृष्टिकोन मांडणारे काही थोडे तरूण निघाले, तरी ती अत्यंत स्वागतार्ह घटना आहे. हिंदूमध्येही संकुचितपणा कमी नाही. आगरकरांची आपण प्रेतयात्रा काढली. फुले पतिपत्नीचा छळ केला. आंबेडकरांची तर पुष्कळच मानहानी झाली. तेव्हा हिंदू सारे उदारमतवादी आहेत असे मानण्याचे काही कारण नाही. पण बुद्धिनिष्ठ ऐहिकवादी विचारसरणीचा पाठपुरावा करणारे काही थोडे महाभाग आपल्यामध्ये निघाले. मुसलमान समाजामध्ये नव्या मूल्यांचे संस्कार घडवून आणण्याचे काम अद्याप व्हावयाचे आहे. त्यांच्यातील सुशिक्षित तरूणांनाच ते करावे लागेल. पण त्यांना पाठिंबा देणे हे आपले कर्तव्य आहे.

समाज परिवर्तनाच्या कार्यात राजकीय पक्षांचा कार्यभाग फार मोठा आहे. सत्ताधारी पक्ष क्रांतिकारक भूमिका घेईल अशी अपेक्षा करणे भाबडेपणाचे ठरेल. याचा अर्थ त्यांने काही केले तरी चालेल असा नाही. त्याच्यावर कठोर टीका झाली; लोकमताचा दबाव आणला गेला तरच तो एखादे दुसरे पाऊल पुढे टाकील. मात्र क्रांतीचा विडा उचलणाऱ्या पक्षांनी तरी अधिक तत्वनिष्ठ भूमिका घेतली पाहिजे. नाहीतरी विधिमंडळात डाव्या पक्षांची हाताच्या बोटांवर मोजण्या इतकीच

माणसे निवडून येतात. मग संधिसाधुपणाच्या या युत्यातरी कशासाठी ? निदान तत्वनिष्ठेचे सामर्थ्य तरी दाखवा. निवडणूकीत तडजोड करून बहुमत मिळण्याचा संभव असेल, तर मी साधनशुचितेचा इतका आग्रहही धरणार नाही. निवडून आल्यावर आपल्या ध्येय धोरणा-नुसार सत्तेचा वापर करून दाखविता येईल. पण सत्ता तर अनेक योजने दूर आहे. मग निदान तत्त्वनिष्ठा तरी सांभाळावी. जोपर्यंत वृत्तपत्राचे स्वातंत्र्य अबाधित आहे तोपर्यंत तुमची जरी दोन माणसे विधानसभेत असली, तरी ती लोकजागृती करू शकतील. आजही पहा. विधानसभेत विरोधी पक्षाची दोन चार माणसेच जरी बोलत असली, तरी सामान्य जनतेची सहानुभूति त्यांच्याकडे जाते. सत्ताधारी पक्ष बेजबाबदार असेल, तर त्याच्याबद्दल अप्रीती निर्माण होते. वृत्तपत्रे खुली नसली, तर मग इलाजच नाही. मग घटनात्मक चळवळच चाल-णार नाही. १९३७ साली मुंबई विधिमंडळात डांगे, आंबेडकर, जमनादास मेहता असे विरोधी पक्षाचे अगदी मोजके प्रमुख होते. पण ते अधिवेशने गाजवीत. तेव्हा केवळ दोनचार जागा वाढल्याने विरोधी पक्षांच्या सामर्थ्यात काही भर पडते असे नाही.

जातिवादाचा विचार आला, की जातीय पक्ष आपल्या डोळयासमोर उभे राहतात. पण जातिवाद हा जातीय पक्षांपुरता मर्यादित नाही. इतर पक्षांतही तो प्रच्छन्नपणे असू शकतो. कॉंग्रेसची घटना जातीय पायावर आधारलेली नाही. निरनिराळया धर्मांच्या लोकांनी हिचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. कॉंग्रेसची राजवट असताना मुसलमान देशभक्त राष्ट्रपती म्हणून निवडून आले. आपल्या लष्करात पारशी, ख्रिश्चन मोठया आधिकार पदावर आहेत. असे धर्माधिष्ठित देशामध्ये घडून येत नाही. पण स्थानिक पातळीवरील कॉंग्रेसचे राजकारण पहा. त्यात जातिवादाचा प्रभाव जरूर आढळेल अल्पसंख्यांकांना आपल्या जातीय हितसंबंधाच्या संरक्षणासाठी वेगळया संघटना काढाव्या लागतात. बहुसंख्यांकांना अशा संघटनांची गरज नसते. प्रादेशिक तत्त्वावर उभारलेल्या संस्थामध्ये त्यांचेच नेहमी संख्याधिक राहाते. मात्र वेगळी जातीय संघटना काढली नाही म्हणजे जातिवादाची भावना नाहीशी झाली असे नव्हे राष्ट्रहिताच्या व्यापक नावाखाली बहुसंख्यांकांना आपला जातीय स्वार्थ सांभाळता येतो. उदाहरणार्थ संधिसमानतेच्या नावाखाली दलितांना दिलेल्या सवलतींना पुष्कळदा विरोध केला जातो.

हिंदू समाजाने शेकडो वर्षे काही जातींना बहिष्कृत मानले. शैक्षणिक व आर्थिक उत्कर्षाची संधी त्यांना नाकारण्यात आली. स्वतंत्र भारतात या जातीना इतरांच्या बरोबरीने येण्यास वाव मिळावा म्हणून शासनाने त्यांना कांही सवलती दिल्या. पण हे सरकारचे जावई आहेत अशीच बहुसंख्य हिंदूंची भावना आहे. सामाजिक अभिसरणासाठी धडपड करणे हे आपले कर्तव्य आहे याची कुणालाच जाणीव नाही. हा छुपा जातिवादच आहे. जातिविशिष्ट सवलती दिल्याने एखाद्या ब्राह्मण अथवा मराठा गरीब मुलाची गैरसोय होते हे खरे. पण ब्राह्मण किंवा

मराठा मुलगा गरीब असला तरी त्याचा काका मामा कोणीतरी जरा चांगल्या परिस्थितीत असतो. त्यांच्याकडून त्याला मदत मिळू शकते. पण वारल्याला, भिल्लाला कुठूनही मदत मिळत नाही. ब्राह्मणाला शेकडो वर्षांची शिक्षणाची परंपरा आहे. शिक्षणाचे महत्व त्याला समजते. अस्पृश्यांचे आदिवासीचे तसे नाही. तेव्हा दलितांमध्ये शिक्षणाची गोडी प्रथम निर्माण केली पाहिजे. त्यांना उत्कर्षाची संधी दिली पाहिजे. विद्यालयाचा दरवाजा उघडा असला म्हणजे संधी मिळाली असे होत नाहीं. इंग्रजीमध्ये एक वाक्य आहे. freedom and power are identical. सामर्थ्याशिवाय स्वातंत्र्याचा काही उपयोग नाही. मी अमेरिकेला जायला मोकळा आहे. मला कुणी धरून ठेवलेले नाही. पण खिशात दमडी नसेल, तर मोकळेपणाला काही अर्थ नाहीं. वारल्यांच्या व ढोरकोळ्यांच्या मुलांना विद्यालयाचे दरवाजे उघडे आहेत. म्हणून या ज्या सवलती आहेत त्यांच्याकडे आपल्या पूर्वसंचिताचे प्रायश्चित्त अशा दृष्टीने आपण पाहिले पाहिजे. त्याबद्दल कुरकुर करण्यात काही अर्थ नाही.

आपल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार आता फार झपाट्याने होत आहे. पूर्वी पुण्या मुंबईसारख्या ठिकाणी दोन चार महाविद्यालये असायची. त्यांना देणग्या परप्रांतीय व्यापाऱ्याकडून मिळायच्या आज तालुक्या तालुक्यामध्ये २ महाविद्यालये काढण्याची स्पर्धा चालू आहे. ही गोष्ट खचितच स्पृहणीय आहे शिक्षणाच्या प्रसारामुळे गुणवत्ता कमी होते हेही खरे नाही. गुणवत्ता सगळीकडेच आज ढासळत चाललेली आहे. याचे कारण ज्ञानावरची श्रद्धाच उडालेली आहे. याबाबतीत मुंबईपासून कोल्हापूरपर्यंत एकच परिस्थिती आहे. मात्र ठराविक गुण मिळाल्याखेरीज कॉलेजात प्रवेश न देणे हा त्यावर उपाय नाही. आज नोकरीसाठीच जो तो शिक्षण घेत आहे. पण नोकऱ्या किती जणांना मिळतील. स्पर्धा वाढू लागली की गुणवत्तेची जरूर भासेल. पण ते स्वाभाविकपणे झाले पाहिजे. आज केवळ गुणाची कसोटी लावली, तर केवळ पुढारलेल्या जातीनाच शिक्षणाची मक्तेदारी मिळेल. नूतन मराठीतील विद्यार्थी आणि गंजपेठेतला विद्यार्थी यांच्या सांस्कृतिक वातावरणात अद्याप खूप तफावत आहे. तेव्हा गुणवतेला महत्व दिले पाहिजे. पण ते करताना त्यातून जातीयवाद डोकावणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. शासनाने सर्व काही करावे असे आपण म्हणतो पण शासन हे अखेर समाजाचे प्रतिबिंब असते. शासन समाजाच्या फार पुढे जाऊ शकत नाही. म्हणून समाजाच्या सर्व थरांतील पुढाऱ्यांनी, विचारवंतांनी, आणि वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटनांनी आपल्यांतील प्रगट व छुपी जातीयता आणि अविवेकी धर्मांधता नाहीशी करण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. असे प्रयत्न जाणीवपूर्वक व जोरकसपणे चालू ठेवले, तरच जनमानसात खऱ्या अर्थाने ऐहिकनिष्ठा खोलवर रुजेल आणि राष्ट्रीय एकात्मतेचे आपले उद्दिष्ट सफळ होईल.

# कृतज्ञ आभार

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेतील हे विचार धन " अक्षर रूपाने " आपल्या हाती देताना कृतज्ञतेने अंतःकरण भरून येते.

आमच्या निमंत्रणाला मान देऊन माननीय प्राचार्य देवदत्त दाभोळकर प्राचार्य मा. प. मंगुडकर आणि प्रा. गं. बा. सरदार या थोर विचारवंतानी एक एक विचाराचे कोरीव लेणे मराठी मनावर कायमचे कोरून ठेवले आहे. त्या सर्वांचे कृतज्ञ आभार मानणे आमचे कर्तव्य आहे !

थोर शद्बांचे हे ' अक्षर ' स्वरूप प्रकट होताना; डॉ. निशिकांत मिरजकर यांनी परिश्रम घेतले आहेत. शामराव घळसासी अशा कामात सतत सहकार्य देत आले आहेत या कार्यातही त्यांनी जिव्हाळ्याने तसदी घेतली आहे.

कराडमधील या दोन्ही साहित्य सेवकांचा अशा कामावरील लोभ, उपक्रमांना रेखीव रूप देणारा ठरतो. म्हणून त्यांचे सप्रेम आभार मानतांना आपले पणाचा आनंदही साठलेला असतो.

श्रीधर मुद्रणालयाचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्या बद्दल आभारी आहोत.

कराड
१२ मार्च १९७४

पी. डी. पाटील
नगराध्यक्ष.

CHAVAN ... IAEMUM 400 021 ... BAYVA

प्रकाशक–
पी. डी. पाटील
अध्यक्ष, कराड नगरपालिका करा

* मुद्रक–
श्री. र. कुलकर्णी
श्रीधर मुद्रणालय, कराड.